सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ४८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अन्यथा... पुन्हा रणशिंग फुंकणार: मनोज जरांगे



तभा वृत्तसेवा
छत्रपती संभाजीनगर : मराठा आरक्षणाच्या मागण्यांबाबत राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर 'हैदराबाद गॅझेट'नुसार जात प्रमाणपत्र देण्याच्या नियमांमध्ये बदल करण्याची लेखी हमी मिळाल्याने उपोषण स्थगित केले, अशी माहिती मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना दिली. सरकारने मुदतीत मागण्यांवर अपेक्षित कार्यवाही केली नाही, तर पुन्हा संघर्षाचे रणशिंग फुंकण्याचा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी शनिवारी अंतरवाली सराटी येथे उन्हात बसून उपोषण सुरू केले होते. सरकारच्या शिष्टाईनंतर त्यांनी मध्यरात्री उपोषण मागे घेतले. 'सरकारच्या शिष्टमंडळाने ५८ लाख कुणबी नोंदींना प्रमाणपत्र व वैधता देण्याचे आणि हैदराबाद गॅझेटनुसार कार्यवाहीचे आश्र्वासन दिले आहे. आंदोलनात गुन्हा दाखल झालेल्या मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. प्रमाणपत्र वितरणात अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, सातारा संस्थानासंदर्भात महिनाभरात शासन निर्णय काढण्यात येईल, शिंदे समितीला एक वर्षाची मुदतवाढ दिली जाईल, तसेच ओबीसी मंत्रालयाच्या धर्तीवर मराठा-कुणबी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जातील', असे आश्र्वासन सरकारने दिले आहे, असे जरांगे म्हणाले.

जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश रोखले जाणार नाहीत. तसेच मान्य केलेल्या मागण्यांबाबत तातडीने अधिसूचना काढण्यात येईल, असेही सरकारने स्पष्ट केले आहे. सरकारने आश्र्वासनांची वेळेत अंमलबजावणी करावी; अन्यथा, पुन्हा लढा उभारण्यास सज्ज असल्याचा इशारा जरांगे यांनी दिला. आमदार प्रसाद लाड यांनी रविवारी रुग्णालयात जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

काँग्रेसच्या सत्ता काळात ओबीसी आणि मराठा समाजाचे नुकसान झाल्याचा आरोप जरांगे यांनी केला. विजय वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांमुळे महाराष्ट्रात काँग्रेस संपुष्टात येत असल्याची टीकाही त्यांनी केली. धनंजय मुंडे यांचे नाव न घेता 'परळीचा नेता' असा उल्लेख केला. माझी आणि त्यांची नार्को टेस्ट करा, मला जेवणातून विष देऊन मारण्याचा कट नेमका कोणाचा होता, हेही स्पष्ट होईल, असे जरांगे म्हणाले.

## सुवर्णपदक विजेत्या चिराग त्यागीची हत्या



वृत्तसंस्था
गाझियाबाद : भारतीय क्रीडा विश्र्वाला हादरवून टाकणारी एक धक्कादायक घटना उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये घडली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारा २५ वर्षीय टी-१२ पॅरा थलीट चिराग त्यागी याची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांपूर्वीच चिरागने राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत आगामी पॅरा आशियाई खेळांसाठी पात्रता मिळवली होती.

चिरागचा मृतदेह गाझियाबादमधील साई कुंज परिसरातील एका पार्कमध्ये आढळून आला. या घटनेनंतर संपूर्ण क्रीडा क्षेत्रात शोककळा पसरली असून, एका होतकरू खेळाडूचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. चिराग त्यागी हा भारतीय पॅरा थलेटिक्समधील उदयोन्मुख आणि प्रतिभावान खेळाडू म्हणून ओळखला जात होता. काही दिवसांपूर्वीच बेंगळुरूमध्ये झालेल्या राष्ट्रीय पॅरा थलेटिक्स स्पर्धेत त्याने ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक पटकावले होते. या यशामुळे त्याने २०२६ च्या अखेरीस जपानमध्ये होणाऱ्या पॅरा आशियाई स्पर्धांसाठी पात्रता मिळवली होती. देशासाठी आणखी पदके जिंकण्याची स्वप्ने डोळ्यांत घेऊन तो घरी परतत होता. मात्र, नियतीने त्याच्यावर क्रूर घाव घालत त्याचे आयुष्यच हिरावून घेतले.

### कार दरीत कोसळली

सिमला : : हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात एक हृदयद्रावक अपघात घडला असून छत्तीसगडमधील पर्यटकांना घेऊन जाणारी कार खोल दरीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. चुराह उपविभागातील बैरागढ-साच पास-किलाड मार्गावर ही दुर्घटना घडली. अपघातानंतर वाहनातील सर्वजण बेपत्ता असून दुर्गम भागामुळे बचावकार्य मोठ्या अडचणींमध्ये सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमधील दोन कुटुंबांतील सात सदस्य हिमाचल प्रदेशात पर्यटनासाठी आले होते. ते डलहौजी येथील एका हॉटेलमध्ये वास्तव्यास होते. त्यांनी प्रसिद्ध साच पास परिसरात फिरण्यासाठी प्रस्थान केले होते. संध्याकाळपर्यंत हॉटेलमध्ये परतण्याचे नियोजन असतानाही ते परतले नाहीत. त्यांच्या मोबाईलवर संपर्क होत नसल्याने हॉटेल व्यवस्थापनाने पोलिसांना माहिती दिली आणि त्यानंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली.

### लिफ्टमध्ये अत्याचार

मुंबई : मुंबईतील कांदिवली पश्र्चिम परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. डहाणूकरवाडी मेट्रो स्थानकातील लिफ्टमध्ये १७ वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे नागरिकांनमध्ये संतापाची लाट उसळी आहे. या प्रकरणामुळे मेट्रो स्थानकांवरील महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारच्या सुमारास संबंधित विद्यार्थिनी नेल आर्टच्या क्लाससाठी जात होती. डहाणूकरवाडी मेट्रो स्टेशनला पोहोचल्यानंतर ती प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर जाण्यासाठी लिफ्टमध्ये चढली. त्यावेळी लिफ्टमध्ये ती एकटी असल्याचा फायदा घेत एका अज्ञात व्यक्तीने तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप होत आहे.

### सचिनची वैभवबद्दल प्रतिक्रिया

मुंबई : राजस्थान रॉयल्सचा १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी आयपीएल २०२६ मधील आपल्या स्फोटक फलंदाजीमुळे देशभर चर्चेचा विषय झाला आहे. सलग दोन हंगामात दमदार कामगिरी करत त्याने क्रिकेटविश्र्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यामुळे आता त्याला लवकरच भारतीय संघात संधी द्यावी, अशी मागणी जोर धरत असताना भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर याने याबाबत महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. सचिनचे विधान सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

### स्पा सेंटरवर छापा

अहिल्यानगर : नगर-मनमाड रस्त्यावरील व्हीआयपी परिसरातील एका हायप्रोफाईल स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने मध्यरात्री छापा टाकत मोठा प्रकार उघडकीस आणला. अक्रम स्पा सेंटर मध्ये मसाजच्या नावाखाली देहव्यापार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत मॅनेजर, मदतनीस आणि एका ग्राहकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून चार महिलांची सुटका करण्यात आली आहे. मात्र या रॅकेटचा मुख्य सूत्रधार संतोष बघे हा फरार झाला आहे.

### कोयनाचा पाणीसाठा घटला

सातारा : कोयना धरणाच्या नवीन तांत्रिक वर्षाला सोमवारपासून (१ जून) प्रारंभ होत आहे. या पार्श्र्वभूमीवर कोयना धरणावर पूर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्राची वरदायिनी असलेल्या कोयना धरणात रविवारी सकाळी (३१ मे) ८ वाजता १० टीएमसी इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक होता. दरम्यान, पायथा वीजगृहातून पुर्वेकडे सुरू २२ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू असलेला विसर्ग आता पूर्णतः बंद करून ते पाणी पश्र्चिमेकडील वीजनिर्मितीसाठी वळविण्यात आले आहे.

## अहिल्यादेवींच्या आदर्शांवर राज्याचा कारभार : शिंदे



तभा वृत्तसेवा
अहिल्यानगर : लोकमाता पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चोंडी येथे आयोजित भव्य जयंती सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्यादेवींच्या विचारांवर राज्यकारभार करण्याची ग्वाही देत चौंडीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याची घोषणा केली. अहिल्यादेवींचा न्याय, लोककल्याण, सेवाभाव आणि मानवतेचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करताना त्यांनी विकास, महिला सक्षमीकरण, शेतकरी हित आणि सांस्कृतिक पुनर्जागरण या सरकारच्या प्राधान्यक्रमांचा पुनरुच्चार केला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रामराव वडकुते, आमदार अमोल खताळ, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार उत्तमराव जानकर, आमदार विठ्ठलराव लंगे, आमदार अक्षय कर्डिले यांच्यासह अनेक मान्यवर नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.अहिल्यादेवी होळकर या केवळ राज्यकर्त्या नव्हत्या, तर लोकमाता, न्यायप्रिय आणि जनतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या युगप्रवर्तक होत्या. त्यांच्या कार्याचे स्मरण झाले की न्याय, धर्म, लोककल्याण आणि आदर्श राज्यकारभार डोळ्यांसमोर उभा राहतो, असे सांगत शिंदे यांनी त्यांच्या जीवनकार्याला अभिवादन केले.चौंडीच्या विकासासाठी राज्य सरकारने सुमारे १२०० कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर केला असून या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. चौंडीहे केवळ गाव नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचे आणि इतिहासाचे पवित्र स्थळ असल्याचे त्यांनी नमूद केले.अहिल्यादेवींच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याला त्यांचे नाव देण्याची मागणी होताच महायुती सरकारने तातडीने निर्णय घेत जिल्ह्याचे नामांतर 'अहिल्यानगर' असे केल्याची आठवण त्यांनी करून दिली. पाहू, बघू अशी भूमिका न घेता त्वरित निर्णय घेणे ही आमची कार्यपद्धती असल्याचे सांगत त्यांनी शासनाच्या निर्णयक्षमतेवर भर दिला.

यावेळी बोलताना शिंदे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या सांस्कृतिक पुनर्जागरणाच्या उपक्रमांचाही गौरव केला. काशी विश्र्वनाथ कॉरिडॉर, महाकाल कॉरिडॉर, अयोध्येतील भव्य राम मंदिर, केदारनाथ पुनर्विकास यांसारख्या प्रकल्पांमुळे भारताचा सांस्कृतिक स्वाभिमान अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यादेवींनी तीनशे वर्षांपूर्वी देशभर मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि लोकोपयोगी कामांच्या माध्यमातून सांस्कृतिक एकात्मतेचे कार्य केले होते. त्याच विचारांचा वारसा आजही पुढे नेला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची ज्योत पेटवली, तर पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून त्या विचारांचा विस्तार संपूर्ण देशभर केला, असे सांगत शिंदे यांनी त्यांच्या कार्याला अभिवादन केले. धर्म, संस्कृती, न्याय आणि मानवतेचा समन्वय साधणाऱ्या अहिल्यादेवी आजही संपूर्ण समाजासाठी प्रेरणास्थान असल्याचे ते म्हणाले.अहिल्यादेवींनी तलवारीपेक्षा न्यायावर, सत्तेपेक्षा सेवाभावावर आणि वैभवापेक्षा जनकल्याणावर विश्र्वास ठेवला. अनेक वैयक्तिक दुःख आणि संकटांना सामोरे जाऊनही त्यांनी समाजकारण आणि लोककल्याणाचा मार्ग सोडला नाही. त्यामुळे तीनशे वर्षांनंतरही संपूर्ण देश त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत असल्याचे शिंदे म्हणाले.

## मुसळधार पावसामुळे केदारनाथ यात्रेला ब्रेक

वृत्तसंस्था
डेहराडून : उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत होण्यास सुरुवात झाली असून, यात्रेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हवामान विभागाने राज्यातील अनेक भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला असून, पुढील काही तासांत जोरदार पाऊस, वादळी वारे आणि भूस्खलनाचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

शनिवारी रात्रीपासून डेहराडून, रुद्रप्रयाग, चमोली, उत्तरकाशी आणि गढवाल विभागातील विविध भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे पर्वतीय भागांतील रस्ते घसरडे झाले असून, काही ठिकाणी भूस्खलनाच्या घटनाही घडल्या आहेत. या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने कोणताही धोका पत्करू नये म्हणून केदारनाथकडे जाणाऱ्या यात्रेकरूंना पुढे जाण्यास मनाई केली आहे.

रुद्रप्रयाग जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार, केदारनाथ ट्रेक मार्गावर असलेल्या सर्व यात्रेकरूंना जवळच्या होल्डिंग पॉइंट्स आणि सुरक्षित निवारा केंद्रांमध्ये थांबविण्यात आले आहे. हवामान अनुकूल होईपर्यंत कोणालाही पुढील प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यात्रामार्गावरील सर्व अधिकारी, पोलीस कर्मचारी, आरोग्य विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यात्रेकरूंना आवश्यक अन्न, निवारा आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारीही करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पर्वतीय भागात अतिवृष्टीमुळे भूस्खलन, दगड कोसळणे आणि रस्ते बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे चारधाम यात्रेच्या विविध मार्गांवर प्रशासनाकडून सातत्याने पाहणी केली जात आहे. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत पोहोचवण्यासाठी बचाव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. प्रशासनाने नागरिक आणि यात्रेकरूंना अफवांवर विश्र्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही आपत्ती, रस्ता अडथळा किंवा अपघात घडल्यास तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्य संचालन केंद्राशी संपर्क साधावा किंवा ११२ हेल्पलाइनवर माहिती द्यावी, असे सांगण्यात आले आहे. रविवारी चारधाम क्षेत्रासह गढवाल विभागातील बहुतांश भागात जोरदार पाऊस झाला. मसुरी, उत्तरकाशी, कोटद्वार, श्रीनगर गढवाल, चमोली, न्यू टिहरी आणि रुद्रप्रयाग या भागांत पावसाचा जोर कायम होता. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा कायम ठेवला आहे.

## ईडीचे वरिष्ठ अधिकारी सत्यव्रत कुमार यांची अचानक स्वेच्छानिवृत्ती

तभा वृत्तसेवा
मुंबई :अंमलबजावणी संचालनालयाच्या (एऊ) अनेक गाजलेल्या आणि हाय-प्रोफाइल प्रकरणांचा तपास करणारे विशेष संचालक सत्यव्रत कुमार यांनी सेवेत तब्बल ११ वर्षांचा कालावधी शिल्लक असतानाच स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या अनपेक्षित निर्णयामुळे प्रशासकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून, त्यांनी अचानक निवृत्ती का स्वीकारली याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

भारतीय महसूल सेवेच्या (खठड) २००४ च्या तुकडीतील अधिकारी असलेल्या सत्यव्रत कुमार यांनी ईडीमध्ये दीर्घकाळ महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. मुंबईत जवळपास ११ वर्षे कार्यरत असताना त्यांनी देशातील अनेक चर्चित आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्डरिंग प्रकरणांचा तपास केला. सध्या त्यांची नियुक्ती सिलीगुडी येथे होती.सत्यव्रत कुमार २०१३ मध्ये ईडीमध्ये सहसंचालक म्हणून रुजू झाले होते. त्यानंतर मुंबई युनिटचे प्रमुख म्हणून त्यांनी अनेक मोठ्या प्रकरणांची सूत्रे हाताळली. हिरे व्यापारी नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांच्याशी संबंधित सुमारे १२,५०० कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळ्याच्या तपासात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. याशिवाय फरार उद्योगपती विजय मल्ल्या आणि त्याच्या किंगफिशर एअरलाइन्सशी संबंधित ९,२०० कोटी रुपयांच्या कथित बँक कर्ज घोटाळा प्रकरणाचाही तपास त्यांच्या देखरेखीखाली झाला होता.

मुंबईत कार्यरत असताना सत्यव्रत कुमार यांनी महाराष्ट्रातील अनेक चर्चित राजकीय नेत्यांशी संबंधित प्रकरणांमध्येही तपासाची धुरा सांभाळली.

## हायड्रोजन ट्रेनला हिरवा कंदील

वृत्तसेवा
नवी दिल्ली : भारतीय रेल्वेने देशातील पहिल्या आणि सर्वात लांब हायड्रोजन ट्रेन प्रकल्पाला हिरवा कंदील दिला आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीच्या दिशेने हे मोठे पाऊल मानले जात आहे. मात्र, जगातील पहिली हायड्रोजन ट्रेन धावणाऱ्या जर्मनीनेच आता या तंत्रज्ञानाबाबत सावध भूमिका घेतल्याने चर्चेला नवे वळण मिळाले आहे. जर्मनीचा अनुभव आणि भारताची योजना यामुळे हायड्रोजन ट्रेनचे अर्थकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

## भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून दर्शनासाठी खुले



तभा वृत्तसेवा
पुणे : बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी पुन्हा खुले होणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या नूतनीकरण आणि विकासकामांनंतर मंदिर प्रशासनाने १५ जून २०२६ पासून नियमित दर्शन पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.सन २०२७ मध्ये होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्र्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून भीमाशंकर परिसरात विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. मंदिराच्या मुख्य सभामंडपासह पायरीमार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. याच कारणास्तव मंदिर प्रशासनाने ९ जानेवारी २०२६ पासून दर्शनासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवले होते. नंतर या बंदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती. मंदिरासमोरील नवीन सभामंडप उभारण्यासाठी साधारणपणे एक वर्षाचा कालावधी अपेक्षित होता. मात्र भीमाशंकर देवस्थान ट्रस्ट, स्थानिक ग्रामस्थ, कामगार आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हे महत्त्वाचे काम अवघ्या पाच महिन्यांत पूर्णत्वास आले आहे. भाविकांना प्रशासनाचे आवाहन दर्शनासाठी ऑनलाईन नोंदणी बंधनकारक मंदिर प्रशासनाने दर्शनासाठी काही महत्त्वाचे नियम जाहीर केले आहेत.५ जून २०२६ पासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू होईल.नोंदणीसाठी मंदिराच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा लागेल.सुरुवातीला दररोज फक्त एक हजार भाविकांनाच दर्शनाची परवानगी दिली जाईल. नोंदणी केलेल्या भाविकांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध असेल.१५ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत दर्शनाची वेळ सकाळी ७ ते ११ अशी असेल.दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# घरकुल घोटाळ्याने जालना हादरले! रोजगार सेवक-गृहनिर्माण इंजिनिअरांच्या चौकशीची मागणी; लाखो रुपयांच्या अपहाराचा आरोप

## बोगस मस्टर, बनावट फोटो अपलोड आणि लाभार्थ्यांची आर्थिक लूट; दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । सुरेश कवडे पाटील**

जालना जिल्ह्यात ग्रामीण भागातील घरकुल योजना, मातोश्री पांदण रस्ते आणि ९५/५ अंतर्गत सिमेंट रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे गंभीर आरोप समोर आले असून यामुळे प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रोजगार सेवक आणि काही गृहनिर्माण अभियंत्यांनी संगनमताने शासकीय योजनांचा गैरफायदा घेत लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अनेक गावांमध्ये घरकुल लाभार्थ्यांच्या नावावर तब्बल २७ हजार ५०० रुपयांचे मस्टर काढण्यात आले. मात्र प्रत्यक्षात संबंधित लाभार्थ्यांना त्याचा कोणताही लाभ मिळाला नसल्याचे सांगितले जात आहे. बोगस मजूर दाखवून मस्टरची रक्कम हडप करण्यात आल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

### गावागावात ग्रामसभा घ्या, हिशोब द्या; अन्यथा घोटाळेबाजांना तुरुंगात धाडा!

लाभार्थ्यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित विभागांकडे निवेदने देण्याची तयारी सुरू केली असून, बोगस मस्टर, बनावट फोटो अपलोड, लाचखोरी आणि निधी अपहार प्रकरणी दोषी आढळणाऱ्या रोजगार सेवक व गृहनिर्माण अभियंत्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. जिल्ह्यातील हजारो गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी असलेल्या घरकुल योजनेतच भ्रष्टाचाराची कीड लागल्याचा आरोप होत असून, आता प्रशासन या गंभीर आरोपांची दखल घेऊन कारवाई करते की नेहमीप्रमाणे फाईलींच्या ढिगाऱ्यात प्रकरण दडपले जाते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

याशिवाय मातोश्री पांदण रस्ते आणि ९५/५ अंतर्गत सिमेंट रस्त्यांच्या कामांमध्येही मोठ्या प्रमाणावर बोगस मस्टर काढून शासनाच्या निधीवर डल्ला मारण्यात आल्याचे बोलले जात आहे. अनेक कामे कागदावर पूर्ण दाखवून निधीची उचल करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, गृहनिर्माण अभियंत्यांवरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. घरकुलाचे हप्ते लवकर मंजूर करून देण्याचे आमिष दाखवत लाभार्थ्यांकडून १० ते १५ हजार रुपये उकळण्यात आल्याची तक्रार पुढे आली आहे. पैसे घेऊनही संबंधित लाभार्थ्यांना अपेक्षित लाभ मिळाला नसल्याने अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत. इतकेच नव्हे तर काही प्रकरणांमध्ये घरकुलाचे प्रत्यक्ष काम न झालेले असतानाही बनावट किंवा दिशाभूल करणारे फोटो अपलोड करून शासकीय यंत्रणेची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप होत आहे. या माध्यमातून निधी मंजूर करून घेऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक गावात ग्रामसभा घेऊन रोजगार सेवकांच्या कामकाजाची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच सर्व गृहनिर्माण अभियंत्यांच्या कार्यपद्धतीचा स्वतंत्र तपास करण्यात यावा, अशी जोरदार मागणी लाभार्थी आणि ग्रामस्थांकडून होत आहे.

## संक्षिप्त



**तभा वृत्तसेवा**

जालना वृत्तपत्र विक्रेत्या संघटनेकडून पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.गांधी चमन येथील वृत्तपत्र विक्रेते सेंटर व जालना वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या विद्याताई पांढरे यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी संघटनेचे रामेश्वर लहामगे, गजानन वीर, बालासाहेब खडेकर, गणेश वाळेकर, गणेश चिनके, संतोष लहाने, शंकर सिंग, ठाकूर, उमेद भदनेकर, शिवराज भंवर, विठ्ठलराव शहाने, दुर्गेश वाळेकर, गोपीचंद सलामबाद, मनोज गरदास, संजय लहाने, ज्ञानेश्वर बुरला आदी उपस्थित होते.

## आज परतूरात जनआक्रोश मोर्चा

### मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे -आकाश भैय्या राक्षे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**



अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात तसेच संविधानिक हक्क आणि सामाजिक एकता जपण्यासाठी परतूर येथे सोमवार, दि. १ जून २०२६ रोजी भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आकाश भैय्या राक्षे यांनी केले आहे.

सकाळी ११ वाजता संविधान चौक (रेल्वे स्टेश-नजवळ), परतूर येथून मोर्चास प्रारंभ होणार असून उपविभागीय कार्यालय, परतूर येथे मोर्चाचा समारोप होणार आहे. अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणामुळे समाजातील ऐक्याला तडा जाऊ शकतो, अशी भावना व्यक्त करत संविधानाने दिलेल्या समान हक्कांच्या संरक्षणासाठी हा जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. मोर्चामध्ये विविध सामाजिक संघटना, युवक, विद्यार्थी, महिला तसेच बहुजन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. संविधानाच्या संरक्षणासाठी आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन आकाश भैय्या राक्षे यांनी केले आहे.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष पदी शुभम आढे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**वाटुर । प्रतिनिधी**



वाटुर ता परतुर येथील युवा सामाजिक कार्यकर्ता शुभम माणिकराव आढे यांची राष्ट्रीय बंजारा परिषद या सामाजिक संघटनेच्या मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे अभिनंदनाचा वर्षाव होत असुन आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे . शुभम आढे हे गेल्या अनेक वर्षांपासून आरक्षण, शिक्षण,युवकांचे प्रश्न सामाजिक न्याय या विषयासाठी कायम अग्रेसर राहुन कार्य करत आहेत समाजातील प्रत्यक घटकाला न्याय मिळावा यासाठी अनेक आंदोलनामध्ये सहभागी झाले समाजात जनजागृती मोहीम राबविण्यात अग्रेसर भुमिका घेतली. समाजाची रुढी परंपरा टिकवून राहावी नविन पिडीला ति अवगत व्हावी या साठी तिज महोत्सामध्ये सक्रिय सहभाग असतो त्यांच्या या कायर्याची दखल घेऊन राष्ट्रीय बंजारा परिषदचे सर्वेसर्वा उद्योजक बारा भक्ती धाम निर्माते धर्मभुषन मा किसनभाऊ राठोड व युवा प्रदेश अध्यक्ष अर्जुन नायक राठोड यांनी शुभम आढे यांची निवड केली या निवडीमुळे युवकांना नवे बळ मिळेल व समाजाचे प्रश्न अधिक प्रभावी पने मांडले जातील असा विश्वास व्यक्त केला. हि निवड माझ्यासाठी अभिमानाची व प्रेरणादायी बाब आहे आपण दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत समाजाच्या हितासाठी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य करत करण्याचा मि प्रयत्न करीन असे प्रतिपादन शुभम आढे यांनी केले.

## जाफ्राबाद-चिखली रोडवर भीषण अपघात; कारला आग लागून तरुणाचा होरपळून मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद । प्रतिनिधी**



जाफ्राबाद-चिखली रोडवरील जंजाळवाडी परिसरात शनिवारी (दि. ३१) पहाटे भीषण अपघात होऊन कारला आग लागल्याने एका ३५ वर्षीय तरुणाचा गाडीतच होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृताचे नाव नितीन प्रभाकर गवळी (वय ३५, रा. रूपचंद नगर, जि. अकोला) असे आहे. ते आपल्या अल्टो कारने नाशिकहून अकोल्याकडे जात होते. पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास जाफ्राबाद-चिखली मार्गावरील जंजाळवाडी परिसरात त्यांच्या कारवरील नियंत्रण सुटले. भरधाव वेगातील कार रस्त्यालगत असलेल्या मोठ्या झाडावर जोरात आदळली. धडक इतकी भीषण होती की, अपघातानंतर कारने तत्काळ पेट घेतला. दरम्यान, गाडीचे दरवाजे लॉक झाल्याने किंवा धडकेमुळे कारचे नुकसान झाल्याने नितीन गवळी यांना बाहेर पडता आले नाही. त्यामुळे ते गाडीमध्येच अडकून पडले आणि आगीत होरपळून त्यांचा जागीच मृत्यू झाला. काही क्षणांतच संपूर्ण कार जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच जाफ्राबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पो-लीस उपनिरीक्षक देव पवार, हेड कॉन्स्टेबल अनंता भुतेकर, पोलीस कर्मचारी विजय जाधव, ओम नागरे, अरुण वाघ तसेच चालक राम मोरे यांच्यासह फॉरेन्सिक व वैद्यकीय पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या वेळी चालकाला डुलकी लागल्याने कारवरील नियंत्रण सुटून हा अपघात घडला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गवळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

## सावधान; मंठ्यामध्ये आता फिल्टरच्या थंड पाण्यात केमिकल!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**




मंठा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर फिल्टर चे थंड पाणी विक्रीचा धंदा मोठ्या प्रमाणावर सर्रास सुरू आहे. मात्र फिल्टर पाणी विक्रेते पाणी थंड करण्यासाठी नकली केमिकल थंड पाणी करण्यासाठी नकली केमिकलचा सर्रास वापर करून नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

मंठा तालुक्यांत फिल्टर पाणी थंड करून विक्री करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.पाणी विक्रेते जास्त नफा मिळवण्यासाठी थंड पाणी करण्यासाठी फिल्टर पाण्याच्या टाकीत निकृष्ट दर्जाचे केमिकल,कॉपर सल्फेट, तुरटी पावडर घालून या केमिकल मुळे पाणी लगेच गार झाल्यासारखे वाटते.हे पाणी पिताना लगेच गार झाल्यासारखे लागते. लोकांना वाटते पाणी एक नंबर फिल्टर आणि थंड आहे.पण हे थंड पाणी शरीराला हानिकारक आहे यांने किडनी, लिव्हर, आणि घसा बसणे कावीळास-ारखे आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाणी विक्रेते याचा थंड आर.ओ.पाणी म्हणून सर्रास बिनबोभाट विक्री सुरू आहे.खर तर ठज नाहींच केमिकल युक्त पाणी आहे.उन्ह-ाळा असल्याने या थंड पाण्याचे डिमांड वाढते.एका जार मागे १४-१७ रुपये निव्वळ नफा केमिकल १००रु किलो १०००जार पाणी थंड करते.नागरीकांचा जीव १०पैशात . या काही पाणी विक्रेत्यांकडे परवाणा नाही, या पाण्याची तपासणी केली जातं नाही.कोणी विचारणं नाही म्हणून यांचं फावते.अन्न व औषध प्रशासन आणि पाणी विक्रेते यांचं जिव्हाळ्याचे आर्थिक संबंध असावेत अशी चर्चा तालुक्यातील नागरिकांतून होत आहे.

## गोंदी पोलिसांची धडक कारवाई; लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व कार जप्त

**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**



मानवी आरोग्यास घातक ठरणाऱ्या प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याच्या अवैध विक्रीविरोधात गोंदी पोलिसांनी मोठी कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक तेजस्वी सिंह संधू व अपर पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदी पोलीस ठाण्याचे सपोनि. अविनाश गंडखड यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार राहागड (ता. अंबड) येथील राणा बँक परिसरात छापा टाकण्यात आला. आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व पानमसाला बेकायदेशीररीत्या कार आणि दुकानात साठवून विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सकाळी सुमारे ६.१० वाजता करण्यात आलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी मारुती सुझुकी डिझायर कार (चक-०४ एद-०५७६) देखील पोलिसांनी ताब्यात घेतली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये राजनिवास सुगंधित पानमसाला, ठ्वऊ पानमसाला, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, विमल पानमसाला, रॉयल-२२० तंबाखू, गोवा-१०००, हिरा पानमसाला आदी विविध ब्रँडचा समावेश असून वाहनासह एकूण सुमारे ६.२६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मेनो दीन हसनजी तांबोळी (वय ४४, रा. राहागड, ता. अंबड, जि. जालना) याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक १६४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३, २७५ तसेच इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक तेजस्वी सिंह संधू, अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलिस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. अविनाश गंडखड, सपोउनि. दिनेश बंडे, पोहेकॉ. सचिन कोकणे, निरंजन बकाल, हरी जाधव, महिला पोहेकॉ. मोना बोराडे, चालक पोहेकॉ. नंदकिशोर जेवळ आदींच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तळणी । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळणी येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती रविवार (दि. ३१) रोजी बसस्थानक परिसरात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर (माऊली) सरकटे, तळणी उपसरपंच विश्वनाथसिंग दादा चंदेल, समाजसेवक दत्तराव काका सरकटे, धनगर समाज तालुकाध्यक्ष कृष्णा वाघमाडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रितेश चंदेल, डॉ. रवींद्र देशमुख, व्यापारी संदीप पाटील, कानडीचे सरपंच कृष्णा खंदारे, प्रदिप पाटील, अशोक राठोड, भागवत मुर्तडकर, अशोक खवणे, श्रीराम गडदे, भगवान मुदळकर, ब्रह्मानंद आढळकर,हरिदास भुसारे, अर्जुन कुकडे, शालिकराम कुकडे, ओम शेळके , ज्ञानेश्वर हनवते, गजानन पातले,संतोष सदावर्ते, कृष्णा आळंदकर, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे-मुंबईपेक्षाही अधिक दागिन्यांची व्हरायटी खंडेलवाल ज्वेलर्समध्ये -प्राजक्ता माळी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

विदर्भातील विश्वासार्ह आणि पारदर्शी व्यवहारांसाठी ओळखल्या जाणाऱ्या खंडेलवाल ज्वेलर्सच्या ९व्या शाखेचे भव्य उद्घाटन शनिवारी (३१ मे) जालना शहरातील बडी सडक परिसरातील आदित्य कॉम्प्लेक्स येथे प्रसिद्ध अभिनेत्री व हास्यजत्रा फेम प्राजक्ता माळी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी बोलताना प्राजक्ता माळी यांनी, पुणे आणि मुंबईपेक्षाही अधिक दागिन्यांची आकर्षक व आधुनिक व्हरायटी खंडेलवाल ज्वेलर्समध्ये उपलब्ध असून ती पाहून मी थक्क झाले आहे, असे गौरवोद्गार काढले.

उद्घाटन समारंभाला जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अविनाश गुप्ता (हैदराबाद), खंडेलवाल ज्वेलर्सचे संचालक नितीन खंडेलवाल व सौ. प्रभा खंडेलवाल, रवी खंडेलवाल व सौ. एकता खंडेलवाल, तसेच पुरुषोत्तम राठी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राजक्ता माळी यांच्या हस्ते फित कापून नवीन दालनाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर सौ. प्रभा खंडेलवाल व सौ. एकता खंडेलवाल यांच्या हस्ते प्राजक्ता माळी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संचालक नितीन खंडेलवाल यांनी खंडेलवाल ज्वेलर्सच्या वाटचालीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, मागील नऊ दशकांपासून पारदर्शक व्यवहार, दर्जेदार सेवा आणि ग्राहकांचा विश्वास या बळावर खंडेलवाल ज्वेलर्सने विदर्भात अग्रस्थान प्राप्त केले आहे. आता मराठवाड्यातील वे-गाने विकसित होत असलेल्या औद्योगिक व स्टील हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जालना शहरात नववे दालन सुरू करून व्यवसायाचा विस्तार करण्यात आला आहे.



प्राजक्ता माळी पुढे म्हणाल्या, सोनं हे महिलांच्या जीवनातील केवळ अलंकार नसून आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अविभाज्य भाग आहे. हजारो वर्षांपासून महिलांचे सोन्यावरील प्रेम कायम आहे आणि भविष्यातही ते कायम राहणार आहे. खंडेलवाल ज्वेलर्समध्ये उपलब्ध असलेली दागिन्यांची विविधता, डिझाइन्स आणि आकर्षक कलेक्शन महिलांना निश्चितच पसंत पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अविनाश गुप्ता यांनी खंडेलवाल ज्वेलर्सच्या प्रगतीचे कौतुक करताना सांगितले की, आज ९व्या शाखेच्या उद्घाटनासाठी आलो आहे. लवकरच ९०व्या शाखेच्या उद्घाटनालाही मला बोलावले जावे, अशी अपेक्षा आहे. ज्वेलरी क्षेत्रातील अनेक उद्योजकांनी २५ ते ३० वर्षांत शेकडो शाखा उभारल्या आहेत. खंडेलवाल ज्वेलर्सच्या उत्कृष्ट सेवा, गुणवत्तापूर्ण उत्पादने आणि ग्राहकांप्रती असलेल्या निष्ठेमुळे तेही लवकरच शंभर शाखांचा टप्पा गाठतील, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.यावेळी संचालक रवी खंडेलवाल यांनी सांगितले की, कुटुंबाच्या सहाव्या पिढीतील हर्षल खंडेलवाल - सौ. शौर्या खंडेलवाल, प्रतीक खंडेलवाल - सौ. रिषिका खंडेलवाल तसेच प्रतीक राठी - सौ. दिपिका राठी यांनी व्यवसायात सक्रिय सहभाग घेतल्यामुळे कार्यक्षेत्राचा विस्तार करण्यास मोठी मदत होत आहे. नवीन पिढीच्या सहभागामुळे आधुनिक तंत्रज्ञान, ग्राहकाभिमुख सेवा आणि नव्या संकल्पनांच्या माध्यमातून व्यवसाय अधिक व्यापक केला जात आहे.

उद्घाटन सोहळ्याला जालना शहरातील सराफा बाजारातील सोने-चांदी व्यापारी, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक तसेच मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नितीन खंडेलवाल आणि रवी खंडेलवाल यांची भेट घेऊन नव्या दालनासाठी शुभेच्छा दिल्या. जालना शहरात सुरू झालेल्या या भव्य दालनामुळे ग्राहकांना आधुनिक, पारंपरिक, लग्नसराई तसेच नवीन ट्रेंडनुसार तयार करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा मोठा संग्रह एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून, मराठवाड्यातील ग्राहकांसाठी ही एक महत्त्वाची भेट ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला 'इन्स्टिट्यु शनल फेलो ऑफ -२०२६' राष्ट्रीय पुरस्कार

## हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी पुरस्कार

**परभणी,/प्रतिनिधी:-** नवी दिल्ली येथील कॉन्फेडरेशन ऑफ हॉर्टिकल्चर असोसिएशन्स ऑफ इंडिया () या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेकडून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ (), परभणी यास 'इन्स्टिट्युशनल फेलो ऑफ -२०२६' ( -२०२६) हा प्रतिष्ठेचा सन्मान हरियाणाचे माननीय मुख्यमंत्री नामदार श्री नायब सिंह सैनी जी यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी हरियाणा राज्यातील महाराणा प्रताप उद्यानविद्या विद्यापीठ (), करनाल येथे दिनांक २८ मे २०२६ रोजी आयोजित १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वीकारला.

कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्यातील उल्लेखनीय योगदान तसेच उद्यानविद्या क्षेत्राच्या प्रगतीसाठी सातत्यपूर्ण कार्य केल्याबद्दल वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला हा सन्मान बहाल करण्यात आला आहे असे चे संस्थापक व अध्यक्ष डॉ. एच. पी. सिंह यांनी नमूद केले.

यानिमित्त माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, हा पुरस्कार विद्यापीठाने मराठवाड्यातील शेती विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव आहे. या पुरस्कारामुळे भविष्यात नव्या उमेदीने विद्यापीठाच्या कार्यात भर पडून विद्यापीठाला राष्ट्रीय पातळीवर नेण्यास चालना मिळेल. तसेच, याद्वारे विद्यार्थी आणि शेतकऱ्यांचे कल्याण साधले जाईल.




सन १९७२ मध्ये स्थापन झालेल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने गेल्या पाच दशकांत कृषि शिक्षण, संशोधन व तंत्रज्ञान प्रसार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. विद्यापीठाने विविध पिकांच्या १६० हून अधिक वाणांची निर्मिती, ६० पेक्षा अधिक शेती अवजारे विकसित करणे तसेच ११०० हून अधिक कृषि तंत्रज्ञान व शिफारसी विकसित केल्या आहेत. हवामान बदल, कोरडवाहू शेती, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शाश्वत शेती यावर विद्यापीठ विशेष भर देत आहे.

विद्यापीठाकडे १६ सलग्न आणि ४० मान्यताप्राप्त महाविद्यालये असून याद्वारे प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी प्रदान केली जाते. विद्यापीठाने याद्वारे तब्बल १.२७ लाख कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण केले आहे. १९ संशोधन केंद्रे, २३ अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (), तसेच विस्तृत कृषी विज्ञान केंद्रांचे जाळे कार्यरत असून शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्याचे कार्य प्रभावीपणे केले जात आहे. डिजिटल कृषि, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान आणि कृषि यांत्रिकीकरण यांसारख्या आधुनिक क्षेत्रांतही विद्यापीठ सक्रियपणे कार्यरत आहे.

या सन्मानामुळे विद्यापीठाच्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक, संशोधन व विस्तार कार्याला मोठी दखल मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# समाज माध्यमांवर आक्षेपार्ह टिप्पणी, आरोपीस तात्काळ अटकेची गंगाखेडमध्ये मागणी

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** समाजमाध्यमावर संभाजीनगर येथील विलास काकडे नामक युवकाने बौद्ध समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह व अपमानास्पद टिप्पणी केल्याच्या निषेधार्थ गंगाखेड शहरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी (दिनांक ३० मे शनिवार) रोजी गंगाखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डोंगरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अधिक माहिती अशी २८ मे रोजी फेसबुकवर केलेल्या एका पोस्टवरील प्रतिक्रियेदरम्यान विलास काकडे याने बौद्ध समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह शब्दप्रयोग करत टिप्पणी केली. या वक्तव्यामुळे बौद्ध समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा निषेध करत गंगाखेड येथील सामाजिक कार्यकर्ते मिलिंद साळवे, संतोष हनवते, अशोक व्हावळे यांनी पोलीस प्रशासनाकडे निवेदन सादर केले. संबंधित आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करून त्याला तात्काळ अटक करावी अशी मागणी करण्यात आली आहे आरोपीवर त्वरित कारवाई न झाल्यास बौद्ध समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर पिराजी कांबळे, अविनाश जगतकर, राहुल मस्के, राहुल साबणे सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत सेलूत आज होणार बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** मा. भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम () दि. २० जून ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्ष प्रमुख व अमान्यता प्राप्त पक्ष प्रमुख यांची बैठक दि. ०१ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, सेलू येथे आयोजित करण्यात आली आहे.
संबंधितांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले आहे.

# वालूर पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी; कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**सेलू,/प्रतिनिधी-** तालुक्यातील वालूर येथील इंडियन ऑइल कंपनीच्या पेट्रोल पंपावर डिझेल खरेदीसाठी गेलेल्या शेतकऱ्याशी कथित गैरवर्तन झाल्याचा वाद आता प्रशासकीय पातळीवर पोहोचला आहे. हातनूर येथील शेतकरी अशोक शेषराव नागटीळे यांनी सेलूचे तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच दोन दिवसांत चौकशी सुरू न झाल्यास तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे.

अशोक नागटीळे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, स्वतःची बाजू वाचविण्यासाठी पेट्रोल पंप व्यवस्थापनाकडून त्यांच्यावर १ हजार लिटर डिझेलची बेकायदेशीर मागणी केल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, आपल्याला इतक्या मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता नव्हती आणि अशी मागणी केल्याचा आरोप निराधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. २८ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजेदरम्यानचे पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही फुटेज प्रशासनाने ताब्यात घेऊन तपासावे. त्यातून संपूर्ण सत्य समोर येईल, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तक्रारीनुसार, शेतातील मशागत, पाळी व नांगरणीच्या कामांसाठी डिझेल खरेदी करण्यासाठी नागटीळे हे सलग दोन दिवस वालूर येथील पेट्रोल पंपावर जात होते. दि. २८ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ते ३५ लिटर व ५० लिटर क्षमतेचे दोन कॅन घेऊन पंपावर गेले होते. त्यावेळी त्यांनी १०० लिटर डिझेलची मागणी केली असता, पंपाचे डीलर शैलेश तोष्णीवाल यांनी त्यांच्याशी अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तसेच वाद वाढल्यानंतर हातात प्लास्टिकचा जाड पाईप घेऊन त्यांना पेट्रोल पंपाच्या परिसरातून बाहेर जाण्यास सांगण्यात आले व सार्वजनिकरीत्या अपमानित करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे. यावेळी वालूरमध्ये माझा हात कोणी धरू शकत नाही, तुझी सोय लावतो, अशी धमकी दिल्याचाही आरोप नागटीळे यांनी या निवेदनाद्वारे केला आहे.

## मानवतचे शिवभक्त कैलास यात्रेस रवाना

**मानवत,/प्रतिनिधी-** शहरातील अकरा शिवभक्त श्रीआदी कैलास यात्रेला रवाना झाले.
उत्तराखंड मधील पिठौडागड जिल्ह्यातील व नेपाळच्या सीमेवर असलेल्या भारतातील पंच कैलास पैकी श्री आदि कैलास यात्रे साठी मानवत शहरातील अकरा शिवभक्त परभणी येथून सचखंड एक्सप्रेसने रवाना झाले.

भारतात पंच कैलास असून हिमाचल प्रदेश मधील कुल्लू जिल्ह्यातील श्रीखंड कैलास, किन्नोर जिल्ह्यातील किन्नोर कैलास, व चंबा जिल्ह्यातील मणी महेश कैलास. उत्तराखंड मधील श्री आदी कैलास, व चीनच्या सीमेलगत असलेले कैलास मानसरोवर व कैलास पर्वत, असुन या पैकी उत्तराखंड मधील पिथोडागढ जिल्ह्यातील श्रीआदि कैलासच्या व ओम पर्वताच्या दर्शनासाठी मानवत येथील श्री आदी कैलास ग्रुपचे अकरा शिवभक्त परभणी येथून सचखंड एक्सप्रेस ने रवाना झाले. हे शिवभक्त मथुरा येथे दोन दिवस मुक्काम करून मथुरा परिसरातील श्रीकृष्ण जन्मभूमी वृंदावन गोकुळ इत्यादी पवित्र ठिकाणाचे दर्शन करून ते दिल्ली मार्गे उत्तराखंड मधील शेवटचे रेल्वे स्टेशन काठगोदाम येथे मुक्काम करून ते यात्रा कंपनी तर्फे काठगोदाम ते पिथौडागढ कढे जाणार तेथून ते भारत व नेपाळच्या सीमेलगत असलेल्या धारचुला येथे मुक्काम करून येथून श्री आदि कैलास पर्वताचे दर्शन व परत गुंजी जवळ इत्यादी पवित्र स्थाळाचे दर्शन घेऊन दि. १२ जून रोजी मानवतला परतणार आहे.

# सेलूच्या कर्तृत्ववान लेकीवर अभिनंदनाचा वर्षाव

## साक्षी कुलकर्णीचा विविध संघटनांच्या वतीने सत्कार

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील साक्षी श्रीपाद कुलकर्णी मसलेकर यांनी केंद्र शासनाच्या आपत्कालीन सूचना प्रणालीच्या निर्मिती मध्ये दिलेल्या योगदानाबद्दल शहरातील विविध शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक संघटना, पत्रकार संघ, महिला मंडळाच्या वतीने शुक्रवार ( दि.२९) रोजी स्वामी रामानंद तीर्थ हिंदी -मराठी ग्रंथालयाच्या वाचन कक्षात नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांची उपस्थिती होती. तर व्यासपीठावर भास्करराव कुलकर्णी, सत्कारमूर्ती साक्षी कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कमी वयात देशपातळीवर सेलूचा नावलौकिक वाढविल्या बद्दल सेलूची कर्तृत्ववान लेक साक्षीवर मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला. नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष पाटील, चंद्रकांत कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर मनोगतात म्हणाले की,'' मुली कुठेही कमी नाहीत हे साक्षीने बुध्दीमत्ता, अभ्यास आणि कर्तृत्ववातून सिध्द केले आहे. छोटासा ग्रामीण भाग गंगामसला व्हाया सेलू ते दिल्ली हा साक्षीचा प्रवास सर्वांनाच प्रेरणा देणारा आहे.'' तर नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांनी, '' साक्षीने भविष्यात इसरो आणि नासामध्ये जाऊन काम करावे. जीवनातील सर्व यशोशिखरे गाठावीत. '' अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. काशिनाथ पल्लेवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुभाष मोहकरे यांनी केले. कार्यक्रमास नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, महेशराव खारकर, उपेन्द्र बेलूलकर, विजय चौधरी, मनिष कदम, ज्येष्ठ पत्रकार नारायणराव पाटील, शिवनारायण मालाणी, गणेश माळवे, पुनमचंद खोना, विजया कोठेकर, ललिता गिल्डा, वसुधा खारकर,



डॉ.भाग्यश्री धामणगावकर, सुनिल गायकवाड, माधव गव्हाणे, नारायण इक्कर, वल्लभ लोया, दत्तात्रय माकोडे, यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सत्कार सोहळा संयोजन समितीचे समन्वयक डॉ.सुरेश हिवाळे, डॉ. शरद ठाकर आणि विविध संघटनांच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. सत्कार सोहळ्याने वातावरणात चैतन्य निर्माण झाले शहरातील नूतन विद्यालय शिक्षण संस्था, स्वामी रामानंद तीर्थ हिंदी - मराठी ग्रंथालय, नूतन विद्यालय, शब्दसह्याद्री व अक्षर प्रतिष्ठान, शारदा विद्यालय, विवेकानंद शैक्षणिक संकुल, जनुभाऊ रानडे व्याख्यानमाला, पत्रकार संघ, व्हाईस ऑफ मिडीया, सेलू नागरी सहकारी पतसंस्था, टेबल टेनिस असोशियशन, महाराष्ट्र, पेंशनर्स असोशियशन, महिला मंडळ, सेलू, मॉर्निंग गृप, नवचेतना प्रतिष्ठान, नूतन महाविद्यालय, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षण परिषद, रेल्वे प्रवासी संघ, श्री शंकरलिंग मंदिर देवस्थान या संस्थेच्या वतीने साक्षी कुलकर्णीचा सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्याने वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते.

## संक्षिप्त वृत्त...

### नांदेड-पनवेल एक्सप्रेसच्या वेळेत पुन्हा बदल

**परभणी,/प्रतिनिधी :** हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६१४ हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्सप्रेसच्या प्रस्थान वेळेत पुन्हा एकदा बदल करण्यात आला आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सदर गाडी ३० मे २०२६ रोजी सुटणारी असून पुनर्नियोजित वेळेनुसार ती ३१ मे रोजी पहाटे १२.५० वाजता सुटणार होती. मात्र, या गाडीचा येणारा रेक वळवलेल्या मार्गाने धावत असून तो सुमारे ६६३ मिनिटे उशिराने पोहोचत असल्याने गाडीच्या वेळापत्रकात पुन्हा बदल करण्यात आला आहे. त्यामुळे आता गाडी क्रमांक १७६१४ हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्सप्रेस ३१ मे २०२६ रोजी पहाटे ४.५० वाजता हजूर साहिब नांदेड स्थानकातून सुटणार आहे.

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना सुधारित वेळेची नोंद घेऊन त्यानुसार प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच या बदलामुळे झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे.

### तिसऱ्या दिवशी सोनपेठ शहराचा पाणीपुरवठा सुरळीत.....

#### पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी नगराध्यक्षांनी रात्र काढली जागून

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** सोनपेठ शहराला पुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन बुधवारी फुटल्यामुळे मागील तीन दिवसापासून शहरात निर्जळी होती. नगराध्यक्ष परमेश्वर कदम, गटनेते हाजी सद्दाम हुसेन, नगरसेवक अक्षय कदम यांसह पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रात्र जागून काढून पाणीपुरवठा सुरळीत केला. ३ दिवसानंतर आज शनिवार ३० मे रोजी शहराचा पाणीपुरवठा सुरू झाला आहे.

सोनपेठ शहराला गोदावरी नदीतून पाणीपुरवठा होतो, बुधवारी मुख्य पाईपलाईनला मोठी गळती लागुन पाईपलाईन फुटली, यामुळे शहराचा पूर्ण पाणीपुरवठा बंद झाला होता. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती होऊ नये म्हणून नगरपरिषदे कडून शर्तीचे प्रयत्न करून पाईपलाईन जोडणी करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत केला.

शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन मागील अनेक वर्षापासून जीर्ण झाली होती. ती पाईप लाईन बदलण्याची आवश्यकता होती परंतु, तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी व नगरपरिषद प्रशासनाने वेळेतच नवीन पाईपलाईन न टाकल्यामुळे मागील अनेक महिन्यापासून नेहमी पाईपलाईन फुटत आहे. पाईपलाईन जीर्ण झाल्यामुळे दुरुस्तीचे काम अत्यंत आव्हानात्मक होते. चिखल आणि पाण्याच्या प्रवाहात कंत्राटदारांना केवळ आदेश न देता नगराध्यक्ष कदम यांनी रात्र जागून स्वतः परिश्रम घेतले. त्यांच्यासोबत गटनेते हाजी सद्दाम हुसेन, नगरसेवक अक्षय कदम यांनी युद्धपातळीवर काम करून घेतले. यामुळे तिसऱ्या दिवशी शहराला पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे.

### ताडकळस परिसरातील शेतकऱ्यांद्वारे वाढीव पाण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** बी-६८ वरील लोहगाव उपविभाग क्रमांक ९ अंतर्गत येणाऱ्या शाखा क्रमांक १९ व २० ताडकळस कालव्यावरील क्षेत्रातील पिके पाण्याअभावी वाळून जात असून गुराढोरांच्या पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे तातडीने वाढीव पाणी उपलब्ध करून द्यावे व कालव्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यासंदर्भात जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी च्या कार्यकारी अभियंत्यांना शेतकऱ्यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. पाण्याअभावी शेती पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत चालल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कालव्यावरील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि वाढीव पाणी सोडून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

या निवेदनावर उपसभापती काशिनाथराव काळबांडे यांच्यासह मन्मथ नावकीकर, गजानन शिराळे, शिवधन शिराळे, वशिष्ठ मिसाळ, दिनकर कुबडे, बसवेश्वर शिराळे, नागेश नावकीकर, ईश्वर शिराळे, त्रिलोकचंद कुबडे, अविनाश शिराळे, निलेश शिराळे, संतराम कुबडे, नागनाथ भोगावकर, ओमप्रकाश शिराळे, नितीन आवरगंड, ईश्वर भाटेगांवकर, भुजंग शिराळे, सदानंद शिराळे, हनुमंत मिसाळ, गुरुदास नावकीकर, भगवान कुबडे, नागेश शिराळे, संजय शिराळे, विनोद शिराळे, कपिल नावकीकर, गजानन नावकीकर, बाळ शिराळे, उमाकांत शिराळे व आकाश शिराळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### नानलपेठ पोलिसांद्वारे ११६ गोवंशीय प्राण्यांची सुटका

#### बायपास परिसरातील शेडवर छापा; प्राण्यांना सेलू येथील गोशाळेत हलविले

**परभणी,/प्रतिनिधी :** नानलपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदखेडा रोडवरील बायपासजवळील शेतजमिनीत गोवंशीय प्राण्यांची कत्तल केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर नानलपेठ पोलिसांनी छापा टाकून ११६ गोवंशीय प्राण्यांची सुटका केली.

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे नानलपेठ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना कारवाईचे आदेश देण्यात आले. त्यानुसार नानलपेठ पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित शेडवर छापा टाकला. यावेळी कत्तलीसाठी आणलेल्या २ गायी, १ वासरू आणि ११३ बैलांसह एकूण ११६ गोवंशीय प्राणी आढळून आले. पोलिसांनी सर्व प्राण्यांची सुटका करून त्यांना सुरक्षित ताब्यात घेतले.

सुटका करण्यात आलेल्या सर्व प्राण्यांना नानलपेठ पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तेथे त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर पशुवैद्यकीय रुग्णालय, परभणी येथे सर्व प्राण्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर या सर्व गोवंशीय प्राण्यांना सेलू येथील श्री संत गोविंदरामजी (संत गोविंद बाबा) दादपंथी मठ व गोशाळेत १२ वाहनांद्वारे सुरक्षितरित्या पाठविण्यात आले.

या प्रकरणी नानलपेठ पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नानलपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक कारवार, नानलपेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक परिहार व त्यांच्या पथकाने केली.

रोखठोक

दिनेश गुणे

# ‘झुरळझेप’ नव्हे, ‘गरुडभरारी’!

ऊर्जेचा एक नियम असतो. ती साठवून ठेवून गरजेप्रमाणे वापरता येत नाही. ती निर्माण होताच वापरली नाही तर वाया जाते. तरुणाई हीदेखील एक ऊर्जाच असते. केवळ वाढते वय म्हणजे तरुणाई नव्हे. या वयाबरोबर ऊर्जादेखील वाढत असते. मन विकसित होत असते. नवनव्या गोष्टींमध्ये रस निर्माण होत असतो, नवनव्या गोष्टी करून पाहण्याची ऊर्मी उफाळून येत असते आणि त्याला वाट करून दिली नाही तर तिचा उद्रेक होतो. तरुणाईची ऊर्जा अशी विस्फोटाच्या दिशेने वाया जाऊ द्यायची नसेल तर तिचा वेळीच विधायक वापर व्हायला हवा. अन्यथा, या ऊर्जेच्या वारूवर कोणीही स्वार होईल आणि या वारूचा लगाम व्यवस्थित हाताळता आला नाही तर तो बेफाम उधळून भलत्याच दिशेला भरकटत जाईल हीच भीती अधिक असते. तरुणाईला ऊर्जेच्या वारूवर स्वार होण्याची उत्सुकता असते, पण लगाम आणि मांड यांवर ‘कमांड’ नसेल, तर फसलेल्या दिशेला वळणारा वारू विध्वंसासही कारणीभूत ठरू शकतो, हे यापूर्वी अनेकदा दिसून आले आहे. भारत हा तरुणाईच्या ऊर्जेने संपन्न असलेला देश आहे. या देशातील ६५ टक्के लोकसंख्या तरुण वयोगटातील म्हणजे पस्तिशीच्या आतील असल्यामुळे या देशात तरुणाईच्या ऊर्जेची कमतरता नाही आणि ही ऊर्जादेखील सतत काही वेगळ्या वाटांचा शोध घेणारी आहे. त्यामुळे तिचा योग्य आणि वेळीच वापर करून घेणे हे समाज आणि व्यवस्थांसमोरील मोठे आव्हान आहे. या तरुणाईने आपली क्षमता सिद्ध केली आहे, बुद्धिमत्तेच्या स्पर्धेत जगाच्या तुलनेत कोठेही मागे नाही याचे अनेक पुरावेही दिले आहेत, म्हणूनच तरुणाईच्या ऊर्जेला नेमकी आणि विधायक दिशा देण्याचे नवनवे प्रयत्न देशात सुरू असतात. या तरुणाईच्या काही अपेक्षाही आहेत. त्या वास्तव आहेत यात शंका नाही. ही ऊर्जा देखील साठवून ठेवता येणार नसल्याने तिचा वेळीच वापर व्हावा ही यापैकी महत्त्वाची वास्तविक अपेक्षा आहे.

सुमारे सात वर्षांपूर्वी, डिसेंबर २०१९ मध्ये आपल्या अखेरच्या जनसंवादाच्या जाहीर कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक महत्त्वाचा मुद्दा चिंतनासाठी देशासमोर ठेवला होता. एका परीने पुढच्या दशकाचे भाकीतच त्यांनी वर्तविले होते. २१ व्या शतकात जन्मलेली पिढी देशाच्या विकासाला गती देण्यात सक्रिय भूमिका बजावणारी असल्याने, शतकासमोर असलेली असंख्य आव्हाने समजून घेत त्यांची मने विकसित होत होती. या पिढीलाच आजच्या, नवयुगाच्या भाषेतील ‘मिलेनियल्स’ म्हणून ओळखले जाते, तर काही जण त्यांना ‘जनरेशन झी’ किंवा ‘जेन झी’ म्हणतात. व्यापक अर्थाने, समाजमाध्यमांनी विकसित केलेली ही ‘सोशल मीडिया जनरेशन’ प्रतिभावान आहे आणि संवेदनशीलही आहे. समाजमाध्यमी मंचांवरून व्यक्त होणारे तिच्या प्रतिभेचे आविष्कार समाजव्यवस्थेला कधी चिंतन, तर कधी चिंतादेखील व्यक्त करण्यास भाग पाडतात. काहीतरी नवीन, वेगळे करण्याचे तिचे स्वप्न असते. तिची स्वतःची मतेही असतात आणि व्यवस्थेकडे लक्षदेखील असते. या पिढीला व्यवस्थेचा तिटकारा असतो किंवा ती व्यवस्था उलथून टाकण्याच्याच मानसिकतेत नेहमी असते असा याचा अर्थ नाही. उलट व्यवस्थेचे प्रामाणिक पालन करण्याचीच त्यांची इच्छा असते. या मानसिकतेस व्यवस्थेकडून प्रामाणिक प्रतिसाद त्यांना अपेक्षित असतो आणि तसा प्रतिसाद मिळाला नाही, तर मात्र ही पिढी अस्वस्थ होते. धैर्याने व्यवस्थेवर प्रश्नचिन्हे उमटवते, व्यवस्थेविरोधात दंड थोपटून उभीदेखील राहते आणि त्याला व्यापक जनआंदोलनाचे रूप देते. समाजमाध्यमांचे शक्तिशाली मंच अशा आंदोलनांमुळे उभे राहिलेले आजकाल जगातील अनेक आंदोलनांमधून दिसून आले आहे. त्यामुळे व्यवस्थेच्या विरोधातील त्यांची भूमिकादेखील विधायकच मानली जाते आणि त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची प्रामाणिक दखल घेऊन त्याची उत्तरे शोधणे ही व्यवस्थेची जबाबदारी असते. कारण व्यवस्थेची घडी बिघडली, तर अराजकता निर्माण होते. या अराजकतेचा आणि अव्यवस्थेचा ‘जेन-झी’ला तिरस्कार आहे. अव्यवस्था आणि अस्थिरता याबद्दल त्यांच्या मनात प्रचंड चीड आहे. आसपासच्या सहजपणे घडून जाणाऱ्या घटनांमधूनही ते दिसून येते. बस थांब्यावर, विमानतळावर, सिनेमा थिएटरमध्ये किंवा कोठेही, कोणी रांगेत उभे असताना मध्येच एखादा घुसला, तर सर्वांत आधी आवाज उठवणारे तरुणच असतात. आणि अशी एखादी घटना घडली, तर इतर तरुण लगेच मोबाईल फोन काढून त्याचा व्हिडीओ बनवतात आणि पाहता पाहता तो व्हिडीओ व्हायरलही होऊन जातो. यामुळे चूक करणाऱ्यालाही आपण काय केले याची जाणीव होते! थोडक्यात, पठडीबाज पद्धतीऐवजी एक नवीन प्रकारची व्यवस्था, नवीन प्रकारचे युग, नवीन प्रकारची विचारसरणी आणि व्यवस्थेची नव्या युगाला अनुसरून असलेली नवी घडी ही या पिढीची अपेक्षा आहे.

ऊर्जा आणि गतिशीलतेने भारलेली मने नेहमी तरुणच असतात. बदल घडवून आणण्याची शक्ती आणि मानसिकता अशा मनांमध्येच असते. त्यामुळे, ही पिढी आपल्या तारुण्याचा कसा वापर करते यावर त्यांचे भविष्य आणि जीवन अवलंबून असते, अशी स्वामी विवेकानंदांची भावना होती. युवा पिढीने समृद्ध असलेल्या कोणत्याही देशात, कल्पना आणि नावीन्यपूर्ण संशोधन, जोखीम घेण्याची तयारी आणि हाती घेतलेले कोणतेही काम पूर्ण करण्याची असीम जिद्द या तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात. कोणत्याही विपरीत परिस्थितीने समोर उभी केलेली आव्हाने पेलण्याची हिंमत या पिढीच्या अंगी असलेल्या ऊर्जेतून ओसंडत असते. कोविडसारख्या जीवघेण्या महामारीच्या संकटात याचा अनुभव देशाने घेतला असल्याने, आव्हाने झेलून परतविणे हा या पिढीसाठी चमत्कार नव्हे, तर सहजसाध्य खेळ असतो.

तरुणाईच्या प्रतिभेचे नवी क्षितिजे उजळणारे ‘स्टार्ट अप’ नावाचे एक क्षेत्र भारतात झपाट्याने उदयास आले आहे. स्टार्टअपच्या जागतिक युगाचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताच्या तरुणाईमध्ये आहे, हे आता सिद्ध होऊ लागले आहे. वर्षानुवर्षे भारतात स्टार्टअपमध्ये विक्रमी गुंतवणूक होत असल्याने हे क्षेत्र वेगाने पुढे जात आहे. लहानमोठ्या शहरांतही या क्षेत्राची व्याप्ती पसरू लागली आहे. आजकाल जगात सर्वाधिक चर्चेत असलेल्या युनिकॉर्नच्या जगातही भारत वेगाने भरारी घेत आहे. सात हजार कोटी रुपयांहून अधिक किमान मूल्य असलेल्या या क्षेत्रात दहा वर्षांपूर्वी जेमतेम नऊ-दहा युनिकॉर्न होते. आता प्रत्येक दहा



दिवसांमागे एका नव्या युनिकॉर्नची निर्मिती होत आहे. हा आश्चर्यजनक वेग म्हणजे, तरुणाईची केवळ ‘झुरळझेप’ नव्हे, तर ‘गरुडभरारी’ म्हणावी लागेल. या वाढीचे आणखी एक वेगळेपण सांगितले जाते. ते म्हणजे, आपल्या देशातील युवकांनी हे यश कोविड महामारीच्या काळात प्राप्त केले आहे. आज भारतातील अनेक युनिकॉर्ननी एक अब्जाहूनही अधिक मूल्यांचा टप्पा पार केला आहे आणि देश-विदेशातून या क्षेत्राला मोठा पाठिंबा मिळत आहे.

जेन झी पिढीच्या या क्रांतीचे आणखी एक वेगळेपण अलिकडे अधोरेखित होताना दिसते. १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली ही पिढी आजकाल केवळ सोशल मीडियावर मत व्यक्त करणारी पिढी राहिलेली नाही; ती सरकारे बदलवू शकणारी राजकीय शक्ती बनली आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने, हवामान संकट, सामाजिक न्याय आणि डिजिटल स्वातंत्र्य या प्रश्नांवर या पिढीने अनेक देशांत प्रस्थापित सत्तांना हादरे दिले. जगातील अनेक देशांत या पिढीने व्यवस्था उलथवून टाकल्या. नव्या व्यवस्थांचा उदय झाला. यामागे या पिढीच्या निश्चित अशा काही अपेक्षा होत्या. मोठ्या अपेक्षांनिशी प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या या पिढीने परिवर्तने घडवून आणली, पण त्यानंतर त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या का, हा प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. कारण, जगात ज्या ठिकाणी असे परिवर्तन घडले, तेथील आजचे वास्तव फारसे आशादायक नाही असेच दिसते.

रस्त्यावरच्या संघर्षातून सत्तापालट घडवून आणणे तुलनेने सोपे असते, ज्या अपेक्षाभंगामुळे असंतोष उफाळलेला असतो, त्या अपेक्षांचे पूर्तता करणे आणि असंतोषाची कारणे दूर करणे अत्यंत कठीण असते. कारण तरुणाईचा हा असंतोष केवळ एखाद्या नेत्याविरुद्ध नव्हे, तर संपूर्ण आर्थिक-सामाजिक व्यवस्थेविरुद्ध होता, हे त्या त्या घटनांतून स्पष्ट दिसते. त्यामुळे, व्यवस्था बदलण्यासाठी घोषणांपेक्षा संस्थात्मक सुधारणा आवश्यक असतात, हेच वर्तमानाचे वास्तव आहे. याची उदाहरणे जगातील जेन झीच्या आंदोलनानंतरच्या परिस्थितीतून स्पष्ट झाली आहेत. बांगलादेशात विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी आरक्षण आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात उग्र आंदोलन उभारले. परिवर्तनानंतर नव्या सत्ताधाऱ्यांनी डिजिटल स्वातंत्र्य, रोजगारनिर्मिती आणि शिक्षणसुधारणा यांची आश्वासने दिली. काही प्रमाणात पोलिस कारवाईवरील नियंत्रण, ऑनलाईन अभिव्यक्तीवरील निर्बंध कमी करणे आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन अशी पावले उचलली गेली. मात्र वस्त्रोद्योगावर अवलंबून अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करू शकलेली नाही. महागाई आणि युवक बेरोजगारी कायम आहे. त्यामुळे आंदोलनातील ऊर्जा आता, व्यवस्था बदलली; पण वास्तविक जीवन बदलले का, या विचाराने अस्वस्थ झाली आहे.

श्रीलंकेतील २०२२ मधील जेन झीच्या आंदोलनाचेही तेच झालेले दिसते. या आंदोलनाने सरकार बदलले, पण अर्थव्यवस्थेत काही फरक पडलाच नाही. या आंदोलनाची उभ्या जगाने दखल घेतली. तरुणाईच्या अपेक्षांचे आणि रोषाचे उग्र दर्शन घडविणाऱ्या या आंदोलनातून इंधनटंचाई, महागाई आणि आर्थिक अस्थिरतेची चिंता ऐरणीवर आली आणि तरुणांनी राष्ट्राध्यक्षांना पदत्यागास भाग पाडले. नंतरच्या सरकारांनी आयएमएफ करार, करसुधारणा, भ्रष्टाचारविरोधी चौकशा आणि प्रशासनिक पारदर्शकतेची भाषा केली. काही आर्थिक स्थैर्य आलेही; पण तरुणांना अपेक्षित असलेली रोजगारक्रांती किंवा राजकीय संस्कृतीतील आमूलाग्र बदल घडले नाहीत. उलट काटकसरीच्या धोरणांमुळे तरुणांवर आर्थिक ताण वाढला.

यातून एक गोष्ट स्पष्ट झाली. ती म्हणजे, रस्त्यावरची क्रांती सशक्त असते. तीमधून तरुणांच्या अपेक्षा सज्जडपणे व्यक्त होतात आणि तिच्या दबावामुळे सरकारे बदलू शकतात. पण व्यवस्थेची बिघडलेली घडी त्यानंतर तातडीने बदलता येत नाही. आंदोलनासारख्या उपायांनी कर्जबाजारी अर्थव्यवस्था काही महिन्यांत बदलत नाही. चिली नावाच्या टिकलीएवढ्या देशातही शिक्षणखर्च, विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध पेटलेल्या तरुणांच्या आंदोलनातून डाव्या विचारांचे तरुण नेतृत्व सत्तेत आले. विद्यार्थिदशेत आंदोलन करणारे गॅब्रिएल बोरिक नवे राष्ट्राध्यक्ष झाले. नव्या सरकारने किमान वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा, महिलांचे अधिकार आणि पर्यावरणीय धोरणांवर भर दिला. पण आर्थिक मंदी, संसदीय विरोध आणि लोकांच्या अतिउच्च अपेक्षा यामुळे बदलांचा वेग कमी पडला. नव्या संविधानाचा मसुदाही जनतेने नाकारला आणि आंदोलनातून जन्मलेल्या या क्रांतीने अपेक्षाभंगाची निराशाच जनतेच्या पदरी पडली. आंदोलनातील आदर्शवाद आणि सत्तेतील व्यवहारवाद या दोन बाबी भिन्न असतातच. पण आदर्शवादाच्या दबावामुळे सत्तेतील व्यवहारवाद तातडीने नमते घेतोच असे नाही. उलट, या दोहोंमध्ये संघर्ष होण्याचीच शक्यता अधिक असते. फ्रान्समध्ये पेन्शन सुधारणा, महागाई आणि बेरोजगारीविरोधात तरुण मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले. मात्र येथे पूर्ण सत्तापालट झाला नाही. तरीही सरकारला काही सामाजिक सवलती, रोजगार प्रशिक्षण योजना आणि हरित उद्योगांत गुंतवणूक वाढवावी लागली. तरीही, फ्रान्समधील तरुणांमध्ये राजकीय व्यवस्थेविरुद्धची नाराजी शमलेली नाही. संपूर्ण युरोपातच, उजव्या आणि डाव्या टोकाच्या राजकारणाकडे तरुणांचा ओढा वाढण्यामागे हेच कारण मानले जाते. ट्युनिशिया, इजिप्त, लिबियासारख्या देशांत तरुणाईने हुकूमशाहीविरुद्ध उठाव केले. सुरुवातीला लोकशाहीची आशा निर्माण झाली; पण अनेक ठिकाणी पुन्हा लष्करी नियंत्रण, यादवी संघर्ष किंवा आर्थिक अस्थिरता निर्माण झाली. कारण आंदोलनाने सत्ता उलथवली, पण मजबूत लोकशाही संस्था निर्माण केल्या नाहीत.

म्हणजे, जेन झीच्या अपेक्षांचे वेग आणि अपेक्षापूर्ती करण्यातील व्यवस्थांचा वेग वेगळा असतो, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. सोशल मीडियाच्या युगाला तत्काळ बदल अपेक्षित असतो. पण अर्थव्यवस्था, रोजगार आणि शिक्षणव्यवस्था बदलण्यासाठी काही काळ जावाच लागतो. ‘जेन झी’ने परिवर्तन घडविलेल्या देशांतील अनेक देश कर्जबाजारी, महागाईग्रस्त किंवा जागतिक बाजारावर अवलंबून आहेत. त्यामुळे सरकारे लगेच रोजगारनिर्मिती करू शकत नाहीत. त्यामुळे, बदल हवा अशी या पिढीची तातडीची मागणी असली, तरी सत्तेतील हितसंबंध सांभाळण्याच्या कसरतीत त्याचा प्राधान्यक्रम कदाचित मागेदेखील पडतो. असंतोषातून सत्तापालट होतो, पण अपूर्ण अपेक्षांतून पुन्हा असंतोष जन्म घेतो. आणि मग समाज एका कायमस्वरूपी अस्थिर चक्रात अडकतो, हेच अनेक आंदोलनांतून दिसून येते. त्यामुळे केवळ आंदोलनांसाठी ताकद देणे ही तरुणाईची गरज नाही, तर या पिढीमध्ये भविष्याविषयीचा विश्वास रुजविणे हे खरे आव्हान आहे. भारतात ते शक्य आहे, कारण येथील जेन झी ही व्यवस्था ‘मोडीत काढण्याच्या’ विचाराची नाही, तर व्यवस्था ‘सुधारण्याच्या’ विचाराची आहे. आवाज वाढविण्यापेक्षा, विचाराची आणि तर्काची ताकद वाढविण्यावर या पिढीचा विश्वास आहे. समंजसपणा, संवाद आणि सहकार्यातूनही बदल घडविता येतात, हे या देशाने अनुभवलेले आहे. या संस्काराचे बाळकडू घेऊनच येथील ‘जेन झी’ घडते आहे.

dineshgune@gmail.com

---

# ‘एआरओसी’ त्वरित लागू व्हावा

विशेष

ॲड. अविनाश तेलंग

कम्युटेशन म्हणजे आपल्या पेन्शनचा ठरावीक भाग विकून, तेवढी रक्कम १५ वर्षे कमी घेणे आणि त्या बदल्यात एकमुस्त रक्कम प्राप्त करणे, यालाच अंशराशीकरण सुद्धा म्हणतात.

विकलेली रक्कम *१२*घटक =मिळणारी रक्कम. हा घटक वयानुसार कमी, कमी होत असतो. आणि हा घटक तक्ताच दोषपूर्ण व अन्यायकारक आहे. १८ वर्षांनंतर नोकरी लागणे व त्यानंतर किमान १० वर्षे नोकरी आणि ६२ वर्षांपर्यंत कमाल नोकरी असा केवळ २८ वर्षे ते ६२ वर्षे असा हा तक्ता नाही, तर १६ वर्षे पूर्ण ते ८४ वर्षे पूर्ण, पुढील जन्म दिवस धरून, असा १७ ते ८५ वर्षांसाठी असलेला, जीवन विम्याचा मृत्युदर आधारित त्यावेळचा (१९५९ सालचा) अंतिम दर तक्ता (अल्टिमेट टेबल) आपल्या सर्वांना गैरलागू असलेला तक्ता, जसाच्या तसा लागू केला आहे. हाच पहिला अन्याय आहे.

जर विविध वयाच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येकी १०० रुपये पेन्शन विकली तर प्रत्येकाला १५ वर्षे = १८० महिने १०० रुपये प्रमाणे १८,००० रुपये परत करावे लागतात. आणि रक्कम मात्र खालीलप्रमाणे मिळते.

१८ वर्षे, घटक १९.२८, मिळतात २३,१३६ रु.

४२ वर्षे, घटक १५.१५, मिळतात १८,१८० रु.

१८ ते ४२ वर्षे जेवढे मिळतात, त्यापेक्षा कमीच भरावे लागतात, व्याजाचा प्रश्नच येत नाही. सर्वांचा गैरसमज आहे की, आता व्याजाचे दर कमी झाल्याने, परतफेड कालावधी कमी झाला पाहिजे, हे कारणच चुकीचे आहे. मात्र ४२ वर्षांनंतर, जसे जसे वय वाढते, तशी तशी रक्कम कमी कमी मिळते.

५५ व्या वर्षी घटक ११.४२, रक्कम = १३,७०४ रु.

६० व्या वर्षी घटक ९.८१, रक्कम = ११,७७२ रु.

अशाप्रकारे खूपच जास्त रक्कम भरावी लागते. म्हणून हा वयावर आधारित तक्ता बदलला पाहिजे.

३१ डिसेंबर २००५ पर्यंत परतफेड करताना हा तक्ता लागू होता. हा अन्याय कमी वाटला म्हणून की काय, सहाव्या वेतन आयोगाने, ०१.०१.२००६ पासून एलआयसीचे (९४-९५) अल्टिमेट टेबल्स ॲण्ड ८ पर्सेंट इंटरेस्ट लोडिंग असलेला नवीन तक्ता लागू केला. त्यामुळे अन्याय अधिकच वाढला. ६०वर्षे वयाच्या व्यक्तीला १०० रुपये पेन्शन विकल्यावर पूर्वी ११,७७२ रुपये मिळत. आता फक्त ९८३३ रुपये म्हणजे १९३९ रुपये कमी मिळतात आणि भरावे मात्र १८,००० रुपये लागतात. पूर्वी ३३.६१ टक्के पेन्शन विकल्यावर मिळणारी रक्कम मिळण्यासाठी आता ४० टक्के पेन्शन कमी होते. म्हणजे ६.३९ टक्के जास्त पेन्शन विकावी लागते. हे दुहेरी नुकसान आहे. रक्कम कमी घ्या व जास्त भरा. ६० वर्षे व्यक्तीसाठी ८ टक्के सरळ व्याजाने १४१ महिन्यांत म्हणजे ११ वर्षे ९ महिन्यांत संपूर्ण वसुली होते. पण शासन १५ वर्षे कालावधी कमी करत नाही. गुजरात सरकारने हा कालावधी १२.१०.२०२२ पासून १३ वर्षे केला आहे.

दुर्दैव असे की, २००६ पासून गेल्या २० वर्षांत कोणत्याही ट्रेड युनियन, मजूर संघटना, शासकीय, केंद्र व राज्य कर्मचारी, जिल्हा परिषद संघटना, यांनी कोणीही या अन्यायाविरुद्ध आंदोलन उभे केले नाही. कोणत्या कोर्टात आव्हान दिले नाही. आज कालबाह्य झालेला तक्ता रद्द करावा, ही मागणी केली नाही. १९५९ सालचा मृत्युदर तक्ता, दर बराच वाढूनही आज ६७ वर्षांनंतर कायम आहे. उलट ८ टक्के व्याजही लागू झाले आहे. वेलफेअर स्टेटचे कर्तव्य शासन पूर्णपणे विसरले आहे. हे चित्र बदललेच पाहिजे.

या अन्यायावर एकच उपाय म्हणजे ‘ऑल रँक वन कम्युटेशन’ (एआरओसी) लागू करणे. वयाचा भेदभाव न करता, सर्वांना समान घटक १० हा लागू करणे. म्हणजे ४२, ४८, ५०, ५५, ६० वर्षे, वय कोणतेही असो, १०० रुपये पेन्शन विकल्यावर त्याला १००*१२*१० (घटक) = १२,००० रुपये मिळतील. जे १०० रुपयेप्रमाणे १२० महिन्यांत म्हणजे फक्त १० वर्षांत वसूल होतील. शासन व कर्मचारी, कोणाचेही नुकसान नाही. सर्वांना समान न्याय. वयानुसार होणारा अन्याय कायमचा दूर होणार. आज नोकरीत असलेले सुखावतील. हा एकमेव पर्याय आहे.

**शासनाची भूमिका** : केंद्र सरकारने कोर्टात भूमिका मांडली की, ही योजना ऐच्छिक आहे. कोणावरही जबरदस्ती नाही. मात्र ज्यांनी पेन्शन विकली, त्यांना १५ वर्षे रक्कम भरावीच लागेल. येथे सरकारला लोकहिताचा विसर पडला आहे.

पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयाने सीडब्ल्यूपी २४९०/२०२४ व ८२२२/२०२४ मध्ये, ज्यांच्या वसुलीला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा अर्जदारांच्या वसुलीला स्थगिती दिली. मात्र नंतर अशाच ७०७ रिट याचिका दाखल झाल्या आणि अंतिम सुनावणीमध्ये त्या सर्व खारीज केल्या. त्यामुळे मिळालेली स्थगिती रद्द झाली. दि. १८.०३.२०२४च्या उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर आधारित ‘सीएटी’ मुंबईने ११.१२.२०२४ ला, १२ वर्षे वसुली पूर्ण झालेल्या अर्जदार कर्मचाऱ्यांच्या पुढील वसुलीला स्थगिती दिली. त्याच आधारावर ‘एमएटी’ नागपूरने देखील अंतरिम स्थगितीचे आदेश दिले आहेत. अजूनपर्यंत कोणत्याही उच्च वा सर्वोच्च न्यायालयाने गुणवत्तेवर आधारित अंतिम निर्णय दिलेला नाही. १७.०१.२०१९ ला दिलेली दिल्ली उच्च न्यायालयाची स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने १५.०४.२०१९ ला खारीज केली आहे.

**सर्वांत महत्त्वाचे** : रवी मलिक, जनरल सेक्रेटरी, अखिल भारतीय पेन्शनर्स असोसिएशन यांना २६.०२.२०२६ ला केशव माधव शर्मा, अव्वर सचिव, पेन्शन मंत्रालय,भारत सरकार यांनी स्पष्टपणे कळविले आहे की, विक्री पेन्शन वसुली कालावधी कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार कोणत्याही कोर्टाला नाही. तो फक्त वित्त मंत्रालयाला व पेन्शन मंत्रालयाला आहे. तसेच आठवे वेतन आयोग सुद्धा याबाबत निर्णय घेऊ शकते. मात्र आजपर्यंत हा वसुली कालावधी कमी करण्याबाबत या तीन संस्थांकडे कोणतेही निवेदन, सूचना, आवेदन प्राप्त झालेले नाही. आणि अंतिम तारीख ३१ मे २०२६ आहे. लेखकाने वैयक्तिक आणि संस्थांमार्फत तीन निवेदने वेतन आयोगास पाठविली आहेत.

९४२००७४१२५
अध्यक्ष, ज्येष्ठ ना. महामंडळ विदर्भ, नागपूर

---

# तंबाखू व्यसनाचे चिंताजनक बदलते प्रकार

प्रासंगिक

चिन्मय पाठक

तंबाखू सेवनांतील धोक्यांची जाणीव जनेतला करून देणे आणि तंबाखू सेवन सोडण्यास प्रवृत्त करणे या हेतूने जागतिक आरोग्य संघटनेतर्फे दरवर्षी ३१ मे रोजी ‘विना तंबाखू दिन - (नो टोबॅको डे)’ पाळला जातो. १९८८ साली पहिल्यांदा ७ एप्रिलला ‘विना तंबाखू दिन’ अर्थात् ‘जागतिक धूम्रपान विरोधी दिन’ पाळला गेला. मात्र १९८८ सालीच एका ठरावाद्वारे ३१ मे हा कायमस्वरूपी ‘विना तंबाखू दिन’ पाळला जाईल असे करण्यात आले. वर्षभर चालणाऱ्या या मोहिमेद्वारे धूम्रशलाका (सिगारेट), बिडी, हुक्का इत्यादी मार्गांनी धूम्रपानाद्वारे तंबाखूचा प्रत्यक्ष धूर ओढणारे आणि धूम्रपान करणाऱ्यांनी हवेत सोडलेल्या तंबाखूच्या धुराची शिकार होणारे दुय्यम किंवा अप्रत्यक्ष तंबाखूसेवकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची दाहकता लोकांपर्यंत पोहचविणे तसेच प्रभावी धोरणांद्वारे तंबाखूचे सेवन कमी होण्यासाठी मुत्सद्देगिरी करणे यावर भर दिला जातो. ‘‘तंबाखू आकर्षणाचा बुरखा फाडणे - निकोटिन आणि तंबाखूच्या व्यसनांचा मुकाबला करणे’’ हे यंदाच्या ‘विना तंबाखू दिनाचे’ सूत्र आहे.

तंबाखू सेवनाने होणाऱ्या निरनिराळ्या व्याधींमुळे जगात अंदाजे ऐंशी लाख लोक दरवर्षी मृत्युमुखी पडतात. यातील सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे हे मृत्यू कर्करोग, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग आणि दीर्घकालीन श्वसन विकार किंवा फुफ्फुसांचे प्रदीर्घ आजार यासारख्या वेदनादायक रोगांनी येतात. याशिवाय तंबाखूच्या व्यसनामुळे प्रजनन समस्या आणि प्रजनन क्षमता/वंध्यत्व समस्या, मधुमेह, रोगप्रतिकार प्रणाली आणि हाडांचे विकार, दातांच्या आणि डोळ्यांच्या व्याधी या आरोग्य विषयक समस्या तंबाखूसेवन करणाऱ्यांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतात.

जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात पंधरा वर्षांवरील वयोगटाचे सुमारे २६७ दशलक्ष लोक तंबाखूचे सेवन करतात. हे प्रमाण वयस्कांच्या लोकसंख्येच्या २९ टक्के



आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने बघता या व्यसनात भारतातील सुमारे २९ टक्के प्रौढ तंबाखूचे व्यसन करतात. याबाबत चीन पाठोपाठ भारताचे स्थान आहे. पुरुषांमध्ये तंबाखूच्या व्यसनाधीनतेचे प्रमाण ४२ टक्क्यांपेक्षा थोडे जास्त, तर महिलांमध्ये हेच प्रमाण सुमारे १४ टक्के आढळते. ग्रामीण भारतात ६८ टक्के घरांमध्ये हे व्यसन पोहोचले असून शहरी भागात ४५ टक्के घरांमध्ये तंबाखूचे सेवन केले जाते. दुर्दैवाने आर्थिक उदारीकरणानंतर जीवनशैलीत दिवसेंदिवस वाढत असलेले ताणतणाव यामुळे तंबाखूची व्यसनाधीनता वाढताना दिसते. आणि ती शहरी महिलांमध्ये वाढताना दिसते.

तंबाखू व्यसनाचे भारतात तीन प्रकार आढळतात. पहिला आणि सर्वांत जास्त प्रमाणात असलेला प्रकार म्हणजे गुटका, सुगंधी किंवा साधा पानमसाला (खर्रा किंवा मावा), या प्रकारे चावून खाण्याचा. दुसरा प्रकार म्हणजे धूम्रपान म्हणजेच बिडी, धूम्रशलाका (सिगारेट) ओढणे. या परंपरागत पद्धतीच्या जोडीला सध्याच्या तरुणाई - जेन झीमध्ये आणखी एका प्रकारे तंबाखूचा शिरकाव झाला आहे, तो म्हणजे वेप, ज्यात घातक प्रमाणात निकोटिन सेवन घडते. तिसरा प्रकार म्हणजे तपकीर किंवा नस. जी नाकावाटे किंवा दात घासायला दंतमंजनासारखी वापरली जाते. हा तिसरा प्रकार सुदैवाने अस्तंगत होण्याच्या दिशेने प्रवास करतो आहे.

एखाद्या व्यसनाला सामाजिक मान्यता मिळते तेव्हा त्या व्यसनाला क्षुल्लक मानले जाण्याचा धोका असतो. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ यांचे सेवन करणे ही एक नकारात्मक कृती असली तरी तिच्याकडे सामान्यतः दुर्लक्ष केले जाते. मात्र ते कर्करोगासारख्या आजाराला आमंत्रण देणारे ठरते. धूम्रशलाकेचा (सिगारेट) आणि बिडीचा धूर त्रासदायक असल्याने तंबाखू कंपन्यांनी ई-सिगारेट काढल्या. त्यामुळे कमी धुरात तितकाच नशा मिळते असे म्हणतात. अमली पदार्थांना दोन प्रकारांमध्ये विभागले जाते. पहिल्या प्रकारात येतात अवसादक किंवा संवेदना मंदावणारे (डिप्रेसेंट). हे मानवी मनाला शांत करणारे आणि सुस्ती आणणारे पदार्थ असतात. या प्रकारात झोपेच्या गोळ्या, दारू, हेरॉईन यासारख्या काही अमली पदार्थांचा समावेश होतो. दुसरा प्रकार म्हणजे उत्तेजक (स्टिम्युलेन्ट्स) पदार्थ यात निकोटिन, अँफेटामिन यासारखे पदार्थ येतात. भारतात तंबाखूचा वापर त्यातील निकोटिनद्वारे उत्तेजन मिळवायला केला जातो असे रुग्णांवर मानसोपचार करताना आढळते. अनेक वेळा तंबाखूने सुरू झालेले व्यसन हळूहळू इतर अमली पदार्थांपर्यंत जाऊन पोहोचते. उपचारांदरम्यान अनेकवेळा व्यसनाच्या बाबतीत बोलताना रुग्ण सांगतात की आम्ही हेरॉईनच्या जोडीला तंबाखूचे सेवन करतो, ज्याने नशा वाढते.

वरील सर्व चित्र भयावह असले तरी देखील एक जागतिक आरोग्य संघटना, विविध देशांतील सरकारे, निरनिराळ्या सामाजिक संस्था यांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांनमुळे या व्यसनांच्या विरोधात वातावरण तयार होताना दिसते. तंबाखूच्या व्यसनाला मधल्या काळात लाभलेली प्रतिष्ठा आणि समाजमान्यता असली तरी तंबाखूचा धोका हा शालेय पातळीवर जनजागृतीद्वारे आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. जनजागृतीच्या जोडीला शाळेच्या १०० मीटर आवारात तंबाखूजन्य पदार्थांची दुकाने लावण्यास मज्जाव आहे. त्यांना दूर नेण्यात आणि कायद्याची अंमलबजावणी करण्यात सर्व नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. पौगंडावस्थेतील मुलांना तंबाखूच्या किंवा इतर व्यसनांमुळे होणाऱ्या उपायांची शास्त्रशुद्ध माहिती मानसशास्त्रज्ञांद्वारे शाळांमधून दिली जाते. धूम्रशलाकांच्या डब्यावर मोठ्या आकारात मुखाच्या कर्करोगाचे भयावह चित्र प्रकाशित केले जाते. तसेच चित्रपट किंवा मालिकांमध्ये धूम्रपानाचा प्रसंग असल्यास त्यावेळी इशारा देणारी सूचना दाखविणे इत्यादी उपाय केले जातात. अनेक वृत्तपत्रांनी आणि माध्यमांनी तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिराती प्रकाशित करणे बंद केले आहे.

आजच्या विना तंबाखू दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी या व्यसनाविरुद्ध एकत्र येऊन लढण्याचा संकल्प करूया!

(लेखक पुण्यात क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आहेत.)
९५१८९३१३०८

---

रविवारची पत्रे

## मोदींच्या परदेश दौऱ्याचे फलित!

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नुकताच यूएई, नेदरलॅण्ड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांचा दौरा आटोपत ऊर्जा, संरक्षण आणि प्रौद्योगिकी क्षेत्रात गेमचेंजर करार करत ऐतिहासिक निर्णय घेतले. इटली दौऱ्यात दोन्ही देशांनी १५ प्रमुख करार केले ज्यामध्ये रक्षा उद्योग, दुर्मिळ खनिजे, कृषी, समुद्री वाहतूक, समुद्री उत्पादने, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याचा समावेश आहे. दोन्ही देशांनी २०२९ पर्यंत द्विपक्षीय व्यापार २० अब्ज यूरोपर्यंत पोहोचवण्याचे लक्ष्य ठेवले आहे आणि रक्षा उद्योगासाठी एक डिफेन्स इंडस्ट्रियल फ्रेमवर्क जाहीर केले आहे, ज्याद्वारे हेलिकॉप्टर आणि समुद्री शस्त्रे यांसारख्या सैन्य उपकरणांचा संयुक्त विकास आणि उत्पादन होणार आहे.

मोदींच्या ताज्या यूएई दौऱ्यात भारत आणि यूएई दरम्यान ५ अब्ज डॉलर्सचे ऐतिहासिक करार झाले, ज्यामध्ये संरक्षण, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचा समावेश आहे. या करारांमध्ये सामरिक संरक्षण भागीदारी (अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा संयुक्त विकास, गुप्तचर माहिती देवाणघावण, दहशतवादविरोधी सहकार्य), स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह (यूएई भारतात ३० मिलियन बॅरल कच्चे तेल साठवेल) आणि पुरवठा करार समाविष्ट आहेत. नॉर्वेमध्ये झालेला दौरा ४३ वर्षांनंतर एका भारतीय पंतप्रधानाचा पहिला दौरा होता आणि या दौऱ्यात भारत-नॉर्वे या दोन्ही देशांनी एकूण १२ करारांवर स्वाक्षरी केली. या दौऱ्यातील सर्वांत महत्त्वाची घोषणा म्हणजे द्विपक्षीय संबंध ‘हरित धोरणात्मक भागीदारी’’च्या स्तरावर आणण्यात आले. नॉर्वेने औपचारिकपणे इंडो-पॅसिफिक ओशन्स इनिशिएटिव्हमध्ये सहभागी होण्याची घोषणा केली, ज्यामुळे समुद्री सुरक्षेतील सहकार्य वाढेल आणि भारत-नॉर्वे डिजिटल विकास भागीदारीची सुरुवात झाली. नेदरलॅण्ड्सच्या तीन दिवसीय दौऱ्यादरम्यान डच पंतप्रधान रॉब जेटन यांच्यासोबत महत्त्वपूर्ण चर्चा केली आणि दोन्ही देशांनी आपले द्विपक्षीय संबंध व्यवहारिक भागीदारीवरून व्यूहात्मक भागीदारी पातळीवर नेण्यास सहमती दर्शवली. भारत-स्वीडन दुहेरी संबंधांना रणनीतिक सहमतीच्या स्तरावर नेणे, भारत-स्वीडन तंत्रज्ञान आणि एआय गलियारा सुरू करणे आणि पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचे ध्येय निश्चित करणे यांचा समावेश होतो.

मोदींच्या या पाच दिवसीय दौऱ्यात भारताला ऊर्जा सुरक्षा, महत्त्वपूर्ण खनिजे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संरक्षण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात लाख-कोटींचे ‘गेमचेंजर’ करार झाल्याने भारताचे आर्थिक आणि रणनीतिक महत्त्व वाढले आहे. मोदींच्या या कूटनीतिक यशाने भारताच्या जागतिक संबंधांमध्ये नवी चालना मिळाली असून, विकसित युरोपीय देशांशी आणि मध्यपूर्वेतील प्रमुख अर्थव्यवस्थांशी भविष्यातील सहकार्याचा पाया दृढ झाला आहे.

**पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री**/ ९४२३११९४७५

## मृत्यूचे ठेकेदार

तरुण भारतातील शनिवारी ‘‘विषारी दारूचे १५ बळी; पाच जण गंभीर’’ ही पुणे-पिंपरीची बातमी आणि ‘‘टपऱ्यांवरील कारवाईत पोलिसांना मृत्यूचा बाजार दिसला नाही का?’’ हा हडपसर स्थानिक नागरिकांचा सवाल वाचून हातभट्टीवाल्यांना अभय देणारे सारेच मृत्यूचे ठेकेदार आहेत असे म्हणावेसे वाटते. उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्रकरणाच्या मुळाशी जा. पण आर्थिक हितसंबंधांचे खूळ लागलेल्या माणसांतील पशूंचे मूळ शेवटी किडलेल्या व्यवस्थेपाशीच सापडणार हे त्यांनाही माहीत असावे. मुळात हातभट्टीवाले आपला पसारा ज्या जागेत मांडतात ती उपलब्ध करून देणारे, तसेच दारूतील भेसळीसाठी स्पिरिट, मिथेनॉल मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देणारे हे पोलिस खात्यातील कर्मचाऱ्यांना माहीत नसतील हे अशक्य वाटते. तरीही गेली अनेक वर्षे हे व्यवहार राजरोस चालू ठेवून अखेर मृत्यूला हैदोस घालायला मोकळे रान देणारी व्यवस्था ही निवडून दिलेल्या कारभाऱ्यांच्या आशीर्वादानेच सुरक्षित व सुरळीत राहू शकते हे सांगायला कोणी अंतर्ज्ञानी असायची गरज नाही. तेव्हा भेसळीचे पदार्थ पुरवठा साखळीतील सोकावलेले मोकाट मारेकरी, त्यांना संरक्षण देणारे स्थानिक भाई, दादा आणि स्थानिक पोलिस यांची कसून चौकशी करून, आरोपींशी त्यांची ओळखपरेड घडवून संबंधितांवर सदोष मनुष्यवधासाठीची कठोर शिक्षेची कारवाई जलद न्यायालयात केली जावी.

**श्रीपाद कुलकर्णी**/ बिबवेवाडी, पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून गुटखा माफियांचे कंबरडे मोडले!

## बसस्थानक परिसर, युसूफ वडगाव आणि सिरसाळा हद्दीत धडक कारवाई; लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड : जिल्ह्यातील अवैध गुटखा साठवणूक, विक्री आणि वाहतूक करणाऱ्या गुटखा माफियांच्या विरोधात बीड जिल्हा पोलीस दलाने अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी धडक छापे टाकून गुटखा माफियांचे कंबरडे मोडले आहे. या विशेष मोहिमेदरम्यान पोलिसांनी गुटखा, एक कार आणि टेम्पो असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

"01.jpg" या फाईल मधील प्रेस नोटनुसार मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेला बीड शहर, युसूफ वडगाव आणि सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटख्याची साठवणूक आणि वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी विशेष मोहीम राबवून तीन स्वतंत्र पथके तयार केली आणि एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. पहिल्या कारवाईत, बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बसस्थानकासमोर एक इसम अवैध गुटखा विक्री करण्यासाठी जवळ



बाळगताना मिळून आला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून सव्वादोन लाख रुपयांचा गुटखा जप्त केला.

दुसरी कारवाई युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. तिथे एका स्वीफ्ट कारमधून अवैध गुटख्याची वाहतूक केली जात असताना पोलिसांनी कारसह चालकाला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी गुटखा आणि स्वीफ्ट कार असा साडेचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर तिसरी कारवाई सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोहनेर गावात करण्यात आली. तिथे एक इसम आपल्या ऑटो रिक्षा आणि टेम्पोमध्ये गुटखा भरून त्याची विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना पोलिसांच्या जाळ्यात अडकला. या कारवाईत पोलिसांनी सव्वापाच लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा गुटखा आणि वाहन जप्त केले. या तिन्ही ठिकाणांहून पोलिसांनी एकूण १२ लाख १३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# माजलगांवातील गोवंश हत्या प्रकरणाचा तातडीने तपास करून दोषींवर कडक कारवाई करा

## ना. पंकजाताई मुंडे यांचे पोलिस अधीक्षकांना निर्देश



बीड दि. ३१ : माजलगांव येथे बकरी ईदच्या दिवशी सुमारे चारशेहून अधिक गोवंशाची निर्दयी आणि अमानुषपणे हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार अत्यंत संतापजनक असून प्रकरणाचा तातडीने तपास करून दोषींवर कडक कारवाई करावी असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

सदर घटना समजताच ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेचच जिल्हा पोलिस अधीक्षकांना संपर्क करून घटनेची माहिती घेतली. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर माजलगांव शहरात मोठ्या प्रमाणावर गोवंशाची कत्तल करण्यात आल्याचे उघड झाले. अतिशय निर्दयी आणि अमानुषपणे हत्या करून गोवंशाचे अवयव मैदानावर फेकण्यात आले, हा प्रकार अत्यंत संतापजनक आहे, याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी या प्रकाराची तातडीने दखल घेतली आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना फोन करून याचा वेगाने तपास करावा आणि दोषींवर कडक कारवाई करावी असे आदेश दिले. जिल्ह्यात अजून कुठे कुठे असे प्रकार झाले आहेत का? याचाही तपास करून कारवाई करण्यास त्यांनी सांगितले आहे.



लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर, तेलगाव कार्यालयात आज पुण्यश्लोक लोककल्याणकारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करनेत आली. प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, अशोक पाटिल, राजेश देशमुख, माणिक सोळंके, नागोराव निर्मळ, महादेव मुरकुटे, दिगंबर विर, गोरख वाशिंबे, धनंजय सोळंके, अभिजित मोरे

# डॉ वैजनाथ कानगुले "भारत गौरव प्रतिभा रत्न" राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

परळी वैजनाथ प्रतिनिधी

गेल्या २७ वर्षा पासून परळी वैजनाथ येथे ओम कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रा डॉ वैजनाथ कानगुले यांना २४ मे २०२६ रोजी दिल्ली येथे" इंटरनॅशनल अवॉर्ड कौन्सिल" यांच्या वतीने भव्य अशा कार्यक्रमात"भारत गौरव




प्रतिभा रत्न " हा राष्ट्रीय पुरस्कार श्री अशोक शर्मा,राज्यमंत्री, मध्यप्रदेश, श्री तन्वीर जफर अली,माजी आय ए एस, ग्रेटर नोएडा,श्री विष्णू कंकणे, निवृत्त राज्य तांत्रिक प्रमुख, मध्य प्रदेश व श्री मुकेश कुमार त्रिपाठी वरिष्ठ वकील, सर्वोच्च न्यायालय,दिल्ली यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.सरांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.या अगोदर ३० डिसेंबर २०२३ होसूर, तामिळनाडू येथे "एशिया इंटरनॅशनल कल्चरल रिसर्च युनिव्हर्सिटी",चेन्नई यांच्या वतीने डी.लिट. ही डॉक्टरेट पदवी सरांना मिळालेली आहे.

# चनई येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



अंबाजोगाई : चनई येथे लोकमाता, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी गावच्या सरपंच रोहिणी सावरे, उपसरपंच अनिल शिंदे, ग्रामसेवक देशमुख साहेब, बार्टीचे समतादूत व्यंकटेश जोशी यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या न्यायप्रियता, लोककल्याणकारी दृष्टीकोन आणि आदर्श प्रशासनाचा वारसा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

वक्त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रजाहिताला सर्वोच्च स्थान देत पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. समाजहित, धर्मकार्य आणि जनसेवेच्या माध्यमातून त्यांनी इतिहासात अजरामर स्थान मिळविले असून त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमास गावातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

### कलियुगात नामस्मरण श्रेष्ठ - ह.भ.प.भार्गव महाराज जोशी

# माळीवेस हनुमान मंदिरात भागवत कथेची सांगता

बीड (प्रतिनिधी) कलियुगामध्ये नामस्मरणाला विशेष महत्त्व आहे, नामस्मरण हेच भगवंत प्राप्तीचा मार्ग आहे. भवसागरातून तरुन जायचे असेल तर भागवत कथा श्रवण करावी,सर्वांनी नामस्मरण करावे असे विचार भागवत कथाकार ह.भ. प. भार्गव महाराज जोशी यांनी केले.



माळवेस येथील हनुमान मंदिरामध्ये पुरुषोत्तम मासानिमित्त हरिहर महिला मंडळाच्या वतीने दिनांक 25 मे ते 31 मे दरम्यान ह भ प भार्गव महाराज जोशी यांच्या भागवत कथा यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. शोभायात्रेने कथेला सुरुवात झाली. रविवारी कथेच्या सांगता प्रसंगी बोलताना हभप भार्गव महाराज म्हणाले की कलियुगामध्ये नामस्मरणाला विशेष असे महत्त्व आहे. नामस्मरण हा एकमेव भगवंत प्राप्तीचा उन्नत मार्ग आहे. भागवत हा सर्व पुराणांचा मुकुटमणी आहे. भगवंताचे सगुण वर्णन भागवतात आहे. मनुष्याला हा भवसागर तरुन जायचा असेल तर सर्वांच्या कल्याणासाठी भागवत कथा श्रवण महत्त्वाचे आहे असे ते म्हणाले. दुर्गादास महाराज जोशी यांनी संहिता पठण केले. समारोप प्रसंगी आयोजकांच्या वतीने महाराजांच्या हस्ते हनुमान मंदिराचे अध्यक्ष सुनील जाधव, डॉ. रमाकांत निर्मळ, डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, नगरसेवक सागर देशपांडे, सुरेंद्र चपळगावकर, केवडकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुनील जाधव यांनी पूजन केले. साथ संगत करणारे दत्ता काळे यांचा सत्कार आणि ग्रंथ पूजन श्याम रुद्रे, सौ. राधिका रुद्रे यांनी केले.

मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली त्यानंतर महाप्रसादाच्या आयोजन करण्यात आले होते.या भागवत कथेला माळीवेस परिसरातील भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# परळी औष्णिक विद्युत केंद्रात सिरसाट, वंजारे, कोठेकर व किर्दंत यांना निरोप

## मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

**परळी** | प्रतिनिधी

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील अति. कार्यकारी अभियंता भीमराव माणिक सिरसाट, मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक महादेव सखाराम वंजारे, कोळसा हाताळी विभागातील श्रेणी-२ कर्मचारी सुधीर वसंतराव कोठेकर तथा तंत्रज्ञ-१ दिपक जनार्धनराव किर्दंत यांना सेवानिवृत्तीनिमित्त दि. २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सत्कारपूर्वक निरोप देण्यात आला.



सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत असून भविष्यातही ते अधिक सक्षम व कार्यक्षमतेने चालू ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

कार्यक्रमात प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांनीही मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता एस. एस. भागवत, अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, कार्यकारी अभियंता पंकज दगडे, कार्यकारी अभियंता मदन पवार, उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर, शाहूराव येवते, उपकार्यकारी अभियंता डी. एस. डोंगरे, कार्यकारी रसायनतंत्रज्ञ सतीश मुंडे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे, श्रीगणेश मुंडे, सुनील पवार, पसारे साहेब, गरड साहेब, कामगार नेते हरीराम गित्ते, संदीप पाटील आदींसह अधिकारी, कर्मचारी, मित्र-परिवार व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाकार्याचा आढावा घेणारी विशेष चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेला गौरविणारा हा निरोप समारंभ अत्यंत भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात य. च.म.मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत



माजलगाव प्रतिनिधी : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मे-जून २०२६ सत्रातील परीक्षा सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात सुरू आहेत. विद्यापीठाच्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा नियोजनबद्ध पद्धतीने पार पडत असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे.

परीक्षा केंद्रावर एकूण १२३४ परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षेस बसले आहेत. यामध्ये बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. व एम.बी.ए. या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

परीक्षेचे यशस्वी नियोजन व अंमलबजावणीसाठी प्राचार्य डॉ. एन. के.मुळे, केंद्र संयोजक प्रा.डॉ. डी. एस. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तसेच दीपक धिरडे, लक्ष्मण खिल्लारे आणि अमोल बेद्रे हे परीक्षा व्यवस्थापनासाठी विशेष सहकार्य करत आहेत तर बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून प्रा. नारायण सोळंकेयांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा सुरळीत सुरू आहेत.

# परळी परिसरातील रेल्वे प्रवाश्यांच्या प्रमुख मागण्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 8 जून रोजी धरणे आंदोलन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

ज्योतिर्लिंग क्षेत्र प्रभू वैद्यनाथाच्या परळी रेल्वे स्थानकातून नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने सिकंदराबाद -परळी-छत्रपती संभाजी नगर-नाशिक मार्गे मुंबई तसेच नवनिर्मित अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या मार्गे परळी-नगर-पुणे-मुंबई,परळी-नगर-शिर्डी तसेच विविध तीर्थक्षेत्रे जोडण्यासाठी थेट रेल्वे सुरू करणे,परळी रेल्वे स्थानकात पीट लाईनची सोय करणे व नांदेड-पनवेल रेल्वे बोगींची संख्या



वाढविणे इत्यादी मागण्यांची योग्य दखल रेल्वे प्रशासनाने घेतली नसल्याने विविध संघटनांनी 8 जून रोजी धरणे आंदोलन रेल्वे स्थानक परिसरात करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे लेखी निवेदन स्टेशन प्रबंधक श्री.मीना यांना देण्यात आले.

या निवेदनावर प्रवासी संघटनेचे अध्यक्ष जी.एस. सौंदळे,परळी रेल्वे विकास समितीचे निमंत्रक विलास ताटे,प्रमुख पदाधिकारी कैलास तांदळे,मराठवाडा जनता विकास परीषद परळी शाखा अध्यक्ष चेतन सौंदळे,प्रा.सत्यनारायण दुबे,श्रीकांत पाथरकर,मिलिंद घाडगे,आर.जी.स्वामी,शेख हबीब,संदीप तिळकरी,गजानन कोकीळ,शेख अजीज,बालासाहेब मुजमुले,चित्राताई देशपांडे,सुनील जठार इत्यादींनी स्वाक्षरी केलेली आहे.


या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने सोमवार दि.8 जून रोजी सकाळी आठ वाजता रेल्वे स्थानकावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चौसाळा ते वाढवणा रस्त्याचे काम पूर्णत्वाकडे; सरपंच लोढा यांच्या प्रयत्नाला यश

बीड दि.31(प्रतिनिधी):- चौसाळा ते वाढवणा या रस्त्याच्या मागणीसाठी परिसरातील ग्रामस्थांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे दोन वर्षांपूर्वी मागणी केली होती. त्यावेळी माजी मंत्री क्षीरसागर यांनी तातडीने पंतप्रधान योजनेतून हा रस्ता मंजूर करून घेतला आणि त्याचे काम आता प्रत्यक्षात पूर्ण होत असल्याची माहिती बाबूशेठ लोढा यांनी दिली आहे.

चौसाळा ते वाढवणा या रस्त्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित होती. या भागातील ग्रामस्थांनी चौसाळा येथील सरपंच बाबुशेठ लोढा यांच्या माध्यमातून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन या रस्त्याचे काम मार्गी लावण्याची मागणी केली होती. तेव्हा माजी मंत्री क्षीरसागर यांनी तातडीने पंतप्रधान योजनेच्या अंतर्गत या रस्त्याला मंजुरी मिळवून घेतली, त्याची टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन कामही सुरू करण्यात आले. आज हे काम जवळपास पूर्ण होत असून पावसाळ्यापूर्वीच या रस्त्याचे काम पुर्ण होणार आहे. या भागातील ग्रामस्थांनी देखील माजी मंत्री क्षीरसागर यांना भेटून रस्त्याचे काम सुरू झाल्याची माहिती दिली होती. आज हा रस्ता पूर्णत्वाकडे गेल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सुरेशराव हिवरेकर यांचे निधन



अंबाजोगाई : अंबाजोगाई पिपल्स बँकेचे माजी संचालक सुरेश अवधुतराव देशपांडे (हिवरेकर) (वय ८७) यांचे शनिवार ३० मे रोजी सकाळी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ होते. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, एक मुलगी,जावई, सुना, नातवंडे,भाऊ, बहिणी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मुकूंदराज समाधी रस्त्यालगतच्या नृसिंहतीर्थ स्मशानभुमी येथे ३१ मे रोजी सकाळी साडे नऊ वाजता अत्यंसंस्कार करण्यात येणार आहेत. खोलेश्वर महाविद्यालयातील प्रा. सतिश हिवरेकर यांचे ते वडील होते.

# शिवसंवाद दौऱ्यातील माणुसकीचा स्पर्श! दु:खाच्या डोंगराखाली दबलेल्या सय्यद कुटुंबाला डॉ. श्रीकांत शिंदे यांचा आधार

**केज** | प्रतिनिधी

मराठवाड्यातील ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या रखरखत्या उन्हात शिवसेनेचा 'शिवसंवाद दौरा' सुरू आहे. अंगाची लाही-लाही करणाऱ्या उष्णतेची पर्वा न करता खासदार डॉ. श्रीकांत शिंदे राज्यभरातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. शाखाप्रमुखांपासून ते जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांच्याशी भावनिक नाते जोडणे, हा या दौऱ्यामागील मुख्य उद्देश आहे.

अशाच दौऱ्यादरम्यान गुरुवारी केज येथे आयोजित आढावा बैठकीत एक हृदयद्रावक घटना घडली. रसूल गफूर सय्यद हे आपल्या कुटुंबावर ओढवलेल्या आर्थिक संकटाबाबत निवेदन देण्यासाठी बैठकीच्या ठिकाणी आले होते. काही दिवसांपूर्वीच त्यांच्या मुलाचे निधन झाल्याने कुटुंब आधीच मोठ्या दुःखातून जात होते. त्या वेदनेतून मार्ग शोधण्यासाठी ते आशेने आले होते. मात्र नियतीने वेगळाच घात केला. बैठकीपूर्वीच त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. उपस्थितांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या घटनेची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी डॉ. श्रीकांत शिंदे यांना परिस्थितीची कल्पना दिली. पुढील कार्यक्रमांचे नियोजन, दौऱ्याची व्यस्तता आणि राजकीय जबाबदाऱ्या बाजूला ठेवत डॉ. शिंदे यांनी थेट सय्यद कुटुंबाच्या घरी जाण्याचा निर्णय घेतला. घरात शोककळा पसरली होती. काही दिवसांतच मुलगा आणि आता कुटुंबप्रमुख अशा दुहेरी आघाताने कुटुंब पूर्णपणे खचले होते. अशा कठीण प्रसंगी डॉ. शिंदे यांनी कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला आणि त्यांच्या दुःखात सहभागी झाले. केवळ सांत्वन करून न थांबता त्यांनी सय्यद कुटुंबासाठी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. यासोबतच कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही शिवसेना उचलेल, अशी आश्वासक ग्वाही दिली.

दुःखाच्या काळोखात आशेचा किरण ठरलेल्या या मदतीमुळे कुटुंबीयांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण त्या अश्रूंमध्ये आधार मिळाल्याची भावना देखील होती.

# पुरुषोत्तमपुरी येथे अधिक मासानिमित्त अंघोळ करताना बुडणाऱ्याचा वाचवला जीव

माजलगाव। प्रतिनिधी

पुरुषोत्तमपुरी येथे अधिक मासानिमित्त दर्शन व यात्रेसाठी आलेल्या भाविकांपैकी एक व्यक्ती नदीपात्रात आंघोळ करत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडू लागला. यावेळी बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या होमगार्ड जवानांनी प्रसंगावधान राखत तत्काळ मदत करून संबंधित भाविकाचे प्राण वाचवले.

पुरुषोत्तम पुरी येथे अधिक मासानिमित्त मोठ्या प्रमाणात भाविक येत आहेत नदीपात्रात आंघोळ करताना एक भाविक खोल पाण्यात गेल्याने बुडू लागला. हा प्रकार तेथे बंदोबस्तासाठी कार्यरत असलेले होमगार्ड जवान राजू पंडित, सुरेश बारस्कर आणि मुजाहिद शेख यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ सतर्कता दाखवत घटनास्थळी असलेली बोट



घेऊन पाण्यातील व्यक्तीपर्यंत पोहोचत त्याला सुखरूप बाहेर काढले.

जवानांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असून उपस्थित भाविकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. राहुल कुमार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित होमगार्ड जवानांची बंदोबस्तासाठी नियुक्ती करण्यात आली होती. जवानांच्या।धाडसा बद्दल अभिनंदन होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जून महिन्यात भाजपकडून विविध कल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन

## कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी सुक्ष्म नियोजन बैठक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**
केंद्रातील मोदी सरकारला बारा वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जनता पार्टीच्या वतीने जून महिन्यात विविध लोककल्याणकारी आणि जनसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांच्या पूर्वतयारीसाठी आणि सूक्ष्म नियोजनासाठी हिंगोली जिल्हा भाजपाची महत्त्वपूर्ण बैठक शहरातील हॉटेल रामकृष्ण येथे संपन्न झाली. या बैठकीत जिल्हा प्रभारी संजय कौडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. जून महिनाभरात राबवल्या जाणाऱ्या विविध अभियानांची रूपरेषा ठरवून मंडळनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले.

या बैठकीला आमदार तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्यासह सुनितादाई मुळे, आतिश दांडेगावकर, जिल्हा उपाध्यक्ष मिलींद यंबल, महिला जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांभाळे, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, जिल्हा उपाध्यक्ष दिलीपराव देसाई, माजी नगराध्यक्ष शिवदास बोड्डेवार, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, प्रशांत सोनी, अवधूत शिंदे, खोब्राजी नरवाडे, सतिश सोमाणी, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, कांतराव कोटकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय ढोके, मंदाकिनी चव्हाण, डॉ.रवि पाटील गोरेगावकर, नगरसेवक हमिद प्यारेवाले,नगरसेवक कैलाश शहाणे, प्रशांत सोनी, शहर कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, शिवा घुगे, डॉ. सुधाकर लोमटे, विठ्ठल भोयर, राहुल मेने, श्रीधर ठिकणे, ओमकार नावडे, गुलाब भोयर उपस्थित होते.

यावेळी संजय कौडगे, आ. मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांत घेतलेले ऐतिहासिक निर्णय, लोककल्याणकारी योजना आणि देशाचा झालेला अभूतपूर्व विकास सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी जून महिनाभर हे अभियान चालवले जाणार आहे. या संदर्भात जिल्हा प्रभारी संजय कौडगे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले आणि प्रत्येक कार्यकर्त्याने यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

# औंढा नागनाथ येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**
पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्ताने औंढा नागनाथ मंदिर परिसरातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी येळकोट येळकोट... जय मल्हार या जयघोषाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा परिसर दुमदुमून गेला.

यावेळी जयंती उत्सव साजरा करत असताना भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष शशिकांत रामराव वडकुते, डॉक्टर असोशियन तालुकाध्यक्ष डॉ विलास खरात, भाजपा किसान मोर्चा प्रदेशउपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, भाजपा तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, काँग्रेस प्रदेश सचिव तथा माजी विश्वस्त प्रा. साहेबराव देवकते, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, मंदिराचे व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, सुरक्षा गार्ड प्रमुख बबन सोनूने, भास्कर पोले, एकनाथ नागरे, पत्रकार गजानन नाईक, गंगाधर देवकते, संजय पोले, नितीन पोले, कल्याण पोले, पंडित पोले, मारोती पोले, शंकर काळे, गणेश पाटील, बापूराव देशमुख, डॉ.रघुनाथ बेंगाळ डॉ. नारायण काचगुंडे, डॉ.नागनाथ मस्के, डॉ. रामप्रसाद काचगुंडे, डी आर कुंडगीर, गणेश जगताप, डीगाबर गिरी, प्रकाश पोले, विलास काचगुंडे, बाळासाहेब बोंगाणे, करण पोले, जगदेव दिंडे, मंचक सोळंके, गणेश जगताप आदी औंढा तालुका सकल धनगर समाजबांधव व लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांचे टॉवरवर चढून आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३१ मे**
तालुक्यातील मौजे पळसगाव येथे तीव्र पाणीटंचाईमुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी आज थेट मोबाईल टॉवर व झाडावर चढून आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने ग्रामस्थांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे.

घटनेची माहिती मिळताच वसमत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले. आंदोलनकर्त्यांची समजूत काढून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. गावकऱ्यांचा आरोप आहे की, अनेक दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित असून वारंवार मागण्या करूनही ठोस उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे महिलांसह नागरिकांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली की, जीव धोक्यात घालून टॉवर आणि झाडावर चढून आंदोलन करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली.

दरम्यान, गावातील काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार सरपंच अमोल मुळे व संभाजी डाखोरे यांच्या वतीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न सुरू आहे, मात्र अनेक ग्रामस्थांचा आरोप आहे की पाणी समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आवश्यक ती प्रभावी कारवाई व पाठपुरावा दिसून येत नाही. त्यामुळे गावात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जल जीवन मिशनचा फायदा कुठे गेला? पळसगावातील आंदोलनामुळे आता जल जीवन मिशन (हर घर जल) योजनेच्या अंमलबजावणीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.गावोगावी या योजनेअंतर्गत लाखो-कोट्यवधी रुपये खर्च करून पाइपलाइन, पाणीपुरवठा व्यवस्था आणि विविध कामे करण्यात आली. मात्र आजही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आंदोलन करावे लागत असेल, तर या योजनांचा प्रत्यक्ष लाभ जनतेपर्यंत पोहोचला का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

निधी खर्च झाला, कामे झाली असे सांगितले जाते; पण नळांना पाणीच येत नसेल तर या योजनांचा उपयोग काय? असा संतप्त प्रश्न गावकरी विचारत आहेत. जल जीवन मिशनच्या कामांची गुणवत्ता, नियोजन आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठा याबाबत चौकशी करण्याची मागणीही जोर धरत आहे.




**हिंगोली- वसमत तालुक्यातील पळसगाव येथे ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाकडे वारंवार विनंनी करूनही पाणीप्रश्न मिटेना अखेर ग्रामस्थांनी मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधले.**

## संक्षिप्त वृत्त

### गणित अध्यापक मंडळाकडून आवाहन

हिंगोली-शाळांत परिक्षा २०२६ मध्ये गणित विषयात १०० पैकी १०० गुण घेणाऱ्या विद्यार्थीचे नांव नोंदणी करण्याचे आवाहन गणित मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी आपली पूर्ण नाव, शाळेचे नाव, मोबाईल क्रमांक सोबत मार्कशीटची सत्यप्रत हे लवकरात लवकर गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष धीरज शर्मा व सचिव शेख रहीम यांच्याकडे दिनांक ५ जून २०२६ पर्यंत जमा करावेत. हिंगोली जिल्हा गणित अध्यापक मंडळामार्फत सत्कार करण्याच्या कार्यक्रम ठेवण्यात येईल. ९४२००३६४२० या व्हाट्सअप क्रमांकावर मार्कशीटची कॉपी सेंड करावी असेही आवाहन करण्यात आले आहे.

### औंढ्यात ट्रक उभ्या कारला धडकला



हिंगोली- औंढा बसस्थानकासमोर मुख्य मंदिर कमानीजवळ शनिवारी दुपारी दीड वाजता ब्रेक फेल झालेला ट्रक उभ्या कारवर आदळून अपघात झाला. या अपघातात कारचालक जखमी झाला. एमएच ४० एन ५२१८ क्रमांकाचा ट्रक औंढा नागनाथ वरून अमरावतीकडे जात होता. ट्रकचालक साहेबराव शंकरराव सोनवने हे वाहन चालवत होते. मुख्य मंदिर कमानीसमोर आल्यावर अचानक ट्रकचे ब्रेक फेल झाले. त्यामुळे ट्रक मागे सरकला आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एमएच १४ जीडी ७७५९ क्रमांकाच्या कारवर जोरात आदळला. कारमधून दर्शनासाठी आलेले सिंगनापूर, जि. परभणी येथील वैभव ज्ञानेश्वर खिल्लारे, वय २६ हे जखमी झाले. त्यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. कारमधील शितल नारायण खिल्लारे, रुपाली वैभव खिल्लारे आणि पाच महिन्यांची बालिका या सुखरूप आहेत. बसस्थानक ते पोलिस ठाणे या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वाहने उभी असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जी एस राहिरे पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस उपनिरीक्षक शेख खुद्दूस,पोलीस उपनिरीक्षक अमोल इंगोले, जमादार संतोष पवार, रविकांत हरकळ, शाहेद सय्यद, अमोल चव्हाण, रमेश मस्के, हरिप्रसाद गुरुपवार, विश्वनाथ ढोणे, राजकुमार कुटे, संतोष धनवे, वसंत चव्हाण,संदीप इंगळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यानंतर ग्रामस्थ संदीप गोबाडे, शेख सिद्दीक , व्यंकटेश पाचमासे अवी जगदेवराव माधव गोरे सह इतरांनी तात्काळ जखमींना बाहेर काढून तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल केले. अपघात ठिकाणी बघ्याची मोठी गर्दी झाली. औंढा नागनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालू होती.

# गहाळ झालेले १० लाखांचे मोबाईल मुळ मालकांना केले परत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**
जिल्ह्यात गहाळ झालेल्या मोबाईलची शोध मोहीम हाती घेवून जिल्हा पोलिसांनी तब्बल १० लाख रूपये किंमतीचे ६० मोबाईल शोधून मुळ मालकांना परत केले आहे. एका विशेष कार्यक्रमात पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांचेहस्ते मुळ मालकांना देण्यात आले.

जिल्ह्यात मागील काही दिवसात मोबाईल चोरीच्या घटना घडल्या होत्या. आठवडी बाजारात खरेदीसाठी आलेल्या नागरिकांचे मोबाईल चोरट्यांनी लांबविले. या शिवाय बसस्थानक, रेल्वे स्थानकावर गर्दींचा गैरफायदा घेवून मोबाईल चोरण्याच्या घटना घडल्या होत्या. या घटना उघडकीस आणून मोबाईल जप्तीसाठी पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपअधीक्षक मयूर रसाळ, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक स्थापन केले होते. यामध्ये जिल्ह्यातील १३ ठाणेदारांसह गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, जमादार दत्ता नागरे, इरफान पठाण, मारोती काकडे, गणेश लेकुळे, प्रदीप झुंगरे, प्रणिता मोरे यांच्या पथकाने मागील एक महिन्यात चोरीला गेलेले ६० मोबाईल जप्त केले. शनिवारी विशेष कार्यक्रमात हे मोबाईल मुळ मालकांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले. नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# पोलिस दलातर्फे जवानांच्या विश्रांतीसाठी सुसज्ज पलंग तयार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**
जिद्द आणि कष्टाच्या जोरावर हिंगोली जिल्हा पोलीस भरतीमध्ये घवघवीत यश संपादन केलेल्या ६५ नवनियुक्त युवकांसाठी जिल्हा पोलीस दलाने कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. भरती प्रक्रियेतून निवड झालेल्या या सर्व भावी पोलिसांच्या राहण्याची उत्तम सोय पोलीस दलातर्फे करण्यात आली आहे.

लवकरच या जवानांचा खडतर प्रशिक्षण काळ (ट्रेनिंग पिरेड) सुरू होत आहे. दिवसभराच्या कठोर प्रशिक्षणानंतर या जवानांना रात्री उत्तम विश्रांती मिळावी, या उद्देशातून प्रशासनाने त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी विशेष व्यवस्था केली आहे. ६५ जवानांना झोपण्यासाठी नवीन आरामदायी पलंग तयार करून घेतले जात आहेत.

पोलीस दलात दाखल होणाऱ्या या नव्या दमाच्या शिपायांचे स्वागत करण्यासाठी पोलीस मुख्यालय सज्ज झाले आहे. सध्या मुख्यालयाच्या आवारात स्थानिक कारागिरांकडून हे पलंग तयार करण्याचे काम अत्यंत वेगाने व युद्धपातळीवर सुरू आहे.

कठोर मेहनतीनंतर वर्दीचे स्वप्न पूर्ण केलेल्या या युवकांना उत्तम सुविधा मिळाव्यात, यासाठी पोलीस प्रशासन विशेष काळजी घेत आहे. पोलीस प्रशासनाच्या या संवेदनशील आणि नियोजनबद्ध भूमिकेमुळे नवनियुक्त जवान आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# हिंगोली-वाशिम महामार्गावर कारसह ७.३८ लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**
हिंगोली-वाशिम महामार्गावर बासंबा पाटीजवळ पोलिस उपअधीखक मयूर रसाळ यांच्या पथकाने शनिवारी छापा टाकून एका कारसह ७.३८ लाखांचा गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी विशेष पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून दररोज अवैध धंद्यांची माहीती घेवून त्यावर छापे टाकले जात आहेत. अवैधदारू विक्री, अवैध गुटखा तसेच अवैध रेती वाहतुकीविरोधात मोहीम राबविण्यात येत आहे.

हिंगोली ते वाशिम मार्गावर एका कारमध्ये गुटख्याची वाहतुक केली जात असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस उप अधीक्षक मयूर रसा, स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक दिलीप मोरे, जमादार संदीप जाधव, धनंजय क्षीरसागर, नितीन गोरे, शिवाजी इंगोले यांच्या पथकाने शनिवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास एका कारची तपासणी केली. यावेळी कारमधील पोत्यात गुटखा असल्याचे दिसून आले.

पोलिसांनी कारमधील डीबी सिग्नेचर फिनेस्ट पानमसाला, रजनीगंधा पान मसाला, एम सेन्टेड तंबाखू, आरएमडी पान मसाला या गुटख्याची पोती जप्त केली आहेत. याशिवाय एक मोबाईल, व कार असा एकूण ७.३८ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी संदीप जाधव यांच्या तक्रारीवरून बासंबा पोलिस ठाण्यात सागर इंदोरिया व एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे. सपोनि विकास आडे उपनिरीक्षक संदीप, जमादार संतोष वाठोरे हे पुढील तपास करीत आहेत.

# आदर्शमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**
येथील आदर्श महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती दिनांक ३१ मे २०२६ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पोलीस कर्मचारी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना पुष्पमाला व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्य विशद करताना डॉ. सचिन हटकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या परोपकार, न्यायनिष्ठा आणि लोककल्याण यांचे मूर्तिमंत प्रतीक आहेत असे भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख उपस्थिती स्टाफ सचिव प्रा. डॉ. प्रा. सचिन हाटकर, मेजर पंढरीनाथ घुगे, प्रवीण दुबे, हिंगोली पोलीस विभागातील कर्मचारी शेख हालिमा, सुमन काळे, परमेश्वर शिंदे, दिलीप लेकुळे, बाबासाहेब कांबळे, संजय डोंगरदिवे. शेख अहमद, शेख जावेद, गजानन यादव शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

# एसबीआयमध्ये तारण ठेवलेल्या सोन्यावर कर्मचाऱ्यांनीच मारला डल्ला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मे -**

नांदेडमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाच्या डॉक्टर लेन शाखेतून ग्राहकांनी तारण ठेवलेल्या तब्बल ८० तोळे सोन्यावर बँकेच्या कॅश इन चार्ज आणि सर्विस मॅनेजरनेच डल्ला मारला असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा डाव उघडकीस येऊ नये म्हणून दोघांनीही बँकेच्या लॉकरमध्ये खरे सोने काढून घेऊन ४१ तोळे बनावट सोने ठेवले होते. याप्रकरणी वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जवळपास पंधरा दिवसांपूर्वी घडलेल्या या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाची नांदेडमध्ये डॉक्टर लेन भागात शाखा आहे. या शाखेत ग्राहकांनी कर्ज घेण्यासाठी सोने तारण म्हणून ठेवले होते. आठ ग्राहकांनी लॉकरमध्ये ठेवलेले ३९१ ग्राम सोने हे बँकेच्या कॅश इन्चार्ज असलेल्या आदित्य प्रकाश सेनगावकर आणि सर्विस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे यांनी संगनमत करून काढून घेतले. त्याचवेळी बँकेच्या लॉकरमधील ४१४ ग्रॅम सोने लंपास करून त्या ठिकाणी बनावट सोने ठेवले. या प्रकारात ८०५.९० ग्राम सोने या दोघांनी लंपास केले. या सोन्याची किंमत ८५ लाख ८१ हजार ५९७ रुपये दर्शविण्यात आली आहे. १८ मे पूर्वी हा प्रकार घडल्याची नोंद करण्यात आली आहे.

या प्रकरणात बँक कॅश इन्चार्ज आदित्य प्रकाश सेनगावकर आणि सर्विस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे या दोघांविरुद्ध स्टेट बँक ऑफ इंडियाच्या डॉक्टर लेन शाखेचे मुख्य शाखा व्यवस्थापक राजीव अनंत कदम यांनी दिलेल्या तक्रारीवरून वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम हे करीत

# पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी तक्रारदारांशी साधला 'संवाद'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मे -**

नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस - नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलीसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट पोलीस उप महानिरीक्षक यांच्यासमोर आपली व्यथा मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उप महानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. चालू महिन्यात, लातूर, हिंगोली व परभणी या जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचे माध्यमातून, मोठ्या प्रमाणावर आपल्या तक्रारी पोलिस उप महानिरीक्षक यांच्यासमोर मांडल्या होत्या. दिनांक ३० मे रोजी, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयात जिल्हा पोलीसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, दुपारी १२.३० ते ०२.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण ३७ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय, इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, इतर उपस्थितांनी पोलीसांच्या कामकाजाबाबत अधिक अपेक्षा व्यक्त केल्या. सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या तक्रारी शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आले आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे हजर होते.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**मुदखेड** -मुदखेड शहर काँग्रेस कमिटी कार्यालयात दि. ३१ मे रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व आदरपूर्वक साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



व तसेच त्यांच्या समाजहितकारी कार्याचा व आदर्श शासनकारभाराचा गौरवपूर्ण उल्लेख केला. या कार्यक्रमा प्रसंगी माजी नगरसेवक गंगाधर डांगे, नगरसेवक प्रतिनिधी तथा शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरीश कोत्तावार,गोविंद गोपानपाल्ले, सुभाष चौदंते, शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, सामाजिक कार्यकर्ते रमेश बोडके,विठ्ठल आचार्य,शेख गौस भाई फुलवाले, मोहन भाई फुलवाले, गंगाधर पाटील मगरे,शेख अनिस भाई नायगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिल्ह्यात दोन दिवसासाठी यलो अलर्ट

**नांदेड,-** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिनांक ३१मे २०२६ रोजी दुपारी १३:१८ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. ३१ मे २०२६ व दि. ०१ जून २०२६ या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. ३१ मे २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा व दि. ०१ जून २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या पांगरी च्यावतीने तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३१ मे -**

नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालय पांगरीच्यावतीने दिनांक ३१ मे २०२६ रोजी जागतिक तंबाखूविरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात तंबाखू खाणे, सिगारेट ओढणे याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे. या प्रसंगी जनजागृती व्हावी म्हणून नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या वतीने खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी शहरातील वजीराबाद, रेल्वे स्टेशन, आय.टी.आय चौक येथे या प्रमुख चौकात पथनाट्याच्या माध्यमातून तंबाखू ही शरीरासाठी किती हानिकारक आहे हे दर्शवून दिले.

नांदेड शहरातील घराघरात विविध ठिकाणी डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तंबाखूविरोधी जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणात करून तंबाखू व्यसनाधीन झालेल्या नागरिकांना व्यसनमुक्त करण्याचा मान मागच्या वर्षी भारतातून पहिला नंबर आला होता. आणि यंदाही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करून. यशाची परंपरा कायम ठेवण्याचे प्रयत्न करत आहोत. यासाठी नांदेड शहराच्या कानाकोपऱ्यात व शासकीय कार्यालय या ठिकाणी तंबाखू विरोधी माहिती सामान्य नागरिक व शासकीय अधिकारी कर्मचारी यांना वारंवार देऊन देऊन त्यांना व्यसनमुक्ती पासून प्रावर्त करण्याचे काम नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाचे विद्यार्थी सातत्याने करत करत आहेत. त्या अनुषंगाने नांदेडचे वजीराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक जयपालसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.यावेळीआजचा तरुण तंबाखूच्या आहारी जाऊन तंबाखूचे सेवन केल्याने कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसरोगाचे आजार तसेच तोंडाच्या कॅन्सर विकार होऊ शकतात. तंबाखू सेवनामुळे केवळ स्वत:चेच नव्हे तर कुटुंबाचे आणि समाजाचेही नुकसान होते.या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तंबाखूच्या वाढत्या समस्येविरोधात, विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाच्या महत्त्वपूर्ण संदेशाचे नागरिकांनी कौतुक केले.हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष विनोदकुमार श्रीरामवार, व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास डागवार, वरिष्ठ प्राध्यापक व मार्गदर्शक डॉ. राजेश कुमार दासी तसेच डॉ. सुजाता देशमुख व डॉ. सुजेल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला.

# कापसावरील आयात शुल्क रद्द : शेतकरी संघटनेचा संताप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मे -**

आगामी कापूस हंगामात दरवाढीची अपेक्षा ठेवलेल्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा धक्का दिला आहे. कापसावरील ११ टक्के आयात शुल्क पुढील ५ महिन्यांसाठी पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. या निर्णयामुळे कापूस उत्पादक शेतकरी देशोधडीला लागेल, असा गंभीर आरोप शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव शिंदे यांनी केला आहे.

सरकारने केलेली उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा फसवी असल्याचे शिवाजीराव शिंदे म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी घोषणा करणाऱ्या सरकारचा शेतकरी विरोधी चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे. संभाव्य दरवाढ रोखण्यासाठीच आयात शुल्क रद्द केले. हा निर्णय कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा आहे. याचा फायदा फक्त कापड उद्योगाला होईल, देशातील कापड स्वस्त होणारच नाही, असा दावा सुद्धा त्यांनी केला आहे.

**काय होणार परिणाम?**

परदेशी कापसाची आयात वाढणार असून आयात शुल्क शून्य केल्यामुळे एआय आणि जेनेटिक मॉडीफाय तंत्राने उत्पादित केलेला, अमेरिका व आफ्रिकन देशांतील स्वस्त कापूस भारतीय बाजारात मोठ्या प्रमाणात येईल. त्यामुळे देशांतर्गत भाव कोसळण्याचा धोका आहे. बाजारात परदेशी कापसाची उपलब्धता वाढल्याने स्थानिक कापसाचे भाव गडगडतील. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होईल.

आयात शुल्क ५ महिन्यांच्या कालावधीसाठी रद्द केल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचा कापूस बाजारात येण्याच्या काळात मोठ्या प्रमाणात आयात केलेल्या कापूस येऊन पडणार आहे. म्हणजे संपूर्ण कापूस हंगामासाठी याचे दुष्परिणाम दिसून येतील. जोपर्यंत शेतकऱ्याकडे माल आहे, तोपर्यंत भाव पाडायचे आणि माल व्यापाऱ्यांकडे गेला की शुल्क पुन्हा लागू करायचे, असा हा डाव असल्याचा आरोप शिंदे यांनी केला.

**उत्पादन खर्चही निघणे कठीण**

बोगस बियाणे, कीड-रोग, निसर्गाची अवकृपा झेलून शेतकऱ्यांनी कपाशीची बाजारपेठ उभी केली आहे. बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, डिझेल व मजुरीचे दर वाढल्याने प्रति एकरी उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. अशा स्थितीत कापसाला किमान ९ ते १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळणे अपेक्षित होते. मात्र आयात खुली केल्याने उत्पादन खर्चही निघणार नाही आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत जाईल, अशी भीती व्यक्त केली आहे.

भारतीय शेतकऱ्यांच्या कापसावर आयात कापसाचा परिणाम होणार नाही, कारण तो लांब धाग्याचा कापूस भारतामध्ये पिकवला जात नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. ते बियाणे सरकार उपलब्ध करून देत नाही तर मग पिकेल कोठून असा सवाल शिंदे यांनी केला आहे.

**अच्छे दिन फक्त उद्योगपतींसाठी?**

शिंदे यांनी सवाल केला की, हा निर्णय शेतकऱ्यांच्या भल्यासाठी आहे की टेक्सटाईल लॉबीतील बड्या उद्योगपतींना स्वस्त कच्चा माल मिळवून देण्यासाठी? ग्राहकाला कापड महाग मिळते तेव्हा नफा शेतकऱ्याला मिळत नाही. पण शेतकऱ्याला दोन पैसे मिळण्याची वेळ आली की सरकार आयात-निर्यात धोरण बदलते. हा कुठला न्याय?

**आंदोलनाचा इशारा**

कापूस पिकवून देशाची अब्रू झाकणारा शेतकरी आज स्वतःच्या भविष्याची वस्त्रे फाटताना पाहत आहे. एकीकडे आत्मनिर्भर भारताच्या गप्पा आणि दुसरीकडे परदेशी कापसाला लाल गालीचा, हे चालणार नाही. सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही तर कापूस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

# अंतरगावात अवैध वाळू उपसा पोलिसांची कारवाई ; ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ३१ मे -**

नांदेड जिल्ह्यात सध्या अवैध वाळू माफियां विरोधात सुरू असलेल्या'ऑपरेशन क्रॅक डाऊन' अंतर्गत नायगांव तालुक्यातील अंतरगाव येथे पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई करत अवैध वाळू उपसा करणाऱ्या टोळीचा मोठा पर्दाफाश केला. गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर टाकलेल्या या छाप्यात तब्बल ७६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने वाळू माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांना ३० मेच्या रात्री गुप्त माहिती मिळाली की, नायगाव तालुक्यातील अंतरगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात बोटींच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू आहे.



माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी तातडीने नियोजन करून ३१ मे रोजी पहाटे १.२० वाजण्याच्या सुमारास दोन पंचांसमक्ष घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांची चाहूल लागताच काही जणांनी घटना स्थळा वरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी घटनास्थळी उभे असलेले एक हायवा, दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी, दोन मोटारसायकली आणि सहा ब्रास काळी रेती असा मोठा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईदरम्यान जेसीबी चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला. संबंधित जेसीबी पोलिसांनी ताब्यात घेत पोलीस बंदोबस्तात ठेवली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये भारत बेंझ हायवा, दोन महिंद्रा ट्रॅक्टर-ट्रॉली, टाटा जेसीबी, दोन मोटारसायकली आणि सहा ब्रास काळी रेतीचा समावेश असून, त्याची एकूण किंमत सुमारे ७६ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस उपनिरीक्षक गजानन तोटेवाड यांच्या फिर्यादी वरून बळवंत गोविंदराव शिंदे, गोपिनाथ बालाजी हंबर्डे, गोविंद तुळशिराव शिंदे, मोहन सखाराव शिंदे, विश्वांभर नागोराव शिंदे, पांडुरंग हानमंत ईबितवार, नागेश संजय हंबर्डे, भिवजी सिताराम तोडे, गजानन भाऊराव तोडे, शंकर बाबाराव शिंदे व इतर एका आरोपीविरुद्ध कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मल्लिका र्जुन कारामुंगे करीत आहेत.

ही धडक कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली कुंटूरचे पोलीस निरीक्षक अरविंद घोडके, पोलीस उपनिरीक्षक मल्लीकार्जुन कारामुंगे, नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गजानन तोटेवाड व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

दरम्यान, या कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी संपूर्ण पथकाचे अभिनंदन करत, जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधातील मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे.

# डॉ.व्यंकटेश मामीलवाड यांच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३१ मे -**

कुशल प्रशासक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक ३१ मे २०२६ रोजी शासकीय रक्तपेढी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच श्री हुजूर साहेब रक्तपेढी संतकृपा मार्केट गुरुद्वारा चौक नांदेड या दोन्ही रक्तपेढीत थेट रक्तदान शिबिराचे आयोजन माजी जिल्हाप्रमुख युवासेना नांदेड चे डॉ .व्यंकटेश मामीलवाड यांनी आयोजित केले होते. यामध्ये मोठ्या संख्येने युवकांनी आपले रक्तदान करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली.



नांदेड शहरातील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने. उन्हाळ्याच्या दिवसात वाढलेल्या तापमानामुळे नांदेड शहरातील रक्तपेढ्यामध्ये रक्तदान रक्ताचा तुटवडा होत असल्यामुळे गरजू रुग्णाची प्रचंड गैरसोय होत आहे. ही बाब डॉ. व्यंकटेश मामीलवाड यांच्या लक्षात आल्याने त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे निमित्त साधून रक्तदान शिबिर थेट रक्तपेढीतच घेण्याचा निर्णय घेतला या कार्यक्रमास कसलाच विलंब न लावता हे रक्तदान शिबिर घेऊन शासकीय रक्तपेढी व श्री हुजूर साहेब रक्तपेढी यांना मोठ्या प्रमाणावर युवकांनी रक्तदान करून रक्त साठा वाढविला या थेट रक्तदान शिबिर कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गीरडे , माझी शिवसेना शहर प्रमुख साहेबराव मामीलवाड, राजेंद्रसिंग टमना, युवा सेनेचे अविनाश इंद्रवाड, लक्ष्मीकांत दिंडे, नागेश गायकवाड,कोमेश गायकवाड, ऋषिकेश वाघमारे, अक्षय गुजूवार, शुभम पवार, निखिल मुंडे, किरण पोकले आदींची उपस्थिती होती.

# अवैध दारु विक्रिसाठी भोकर शहर सूरक्षित!

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ३१ मे -**

शहरात पहाटे पासून रात्री उशीरापर्यंत अवैध दारु विक्रि सूरु असताना राज्य उत्पादन शूल्क विभाग मात्र झोपेचं सोंग घेत असुन मोठ्या प्रमाणात दारु विक्रि होत असल्यामूळे अवैध दारू विक्रिला भोकर शहर सूरक्षित असल्याची चर्चा होत आहे.

भोकरमध्ये अधिकृत परवाना असलेली देशी दारुची दूकाने तर काही बार अँन्ड रेस्टॉरन्ट चालतात परवानाधारकांना शासनाकडून विक्रीचे नियम व अटी घालून दिले दूकाने उघडण्याची व बंद करण्याची वेळ ठरवून दिलेली आहे.अवैध दारु विक्रि करणाऱ्यांना कोणताही नियम नसतो ना कूणाची भिती रात्री बेरात्री आपली दूकाने सूरुच ठेवली जातात व याठिकाणी दारुड्यांना कोणत्याही वेळेला दारु उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत आहे, शहरातील व शहरालगत मटन खानावळ व धाब्यावरील अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून होत असलेली दारु विक्री थांबवण्याची मागणी शहरातील बार ॲन्ड रेस्टॉरन्ट असोशिएशन कडून मागील काही दिवसापूर्वी संबधित विभागाकडे करण्यात आली होती संबधित विभागाकडून बार ॲन्ड रेस्टॉरंट चालकांच्या मागणीकडे सोयीस्कर दूर्लक्ष करण्यात आल्याने अवैध दारु विक्रि करणाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. शहरात खूलेआम अवैध दारु विक्रि होत असल्याचे पहावयास मिळते उत्पादन शूल्क विभागाचे संबधित कर्मचारी अवैध दारु विक्रेत्यांकडून दरमहा हफ्ते वसूली करित असल्याची चर्चा असून हफ्तेखोरीमूळे मटनखानावळ आणि धाब्यावर सर्रासपणे अवैधरित्या दारु विक्रि होत असल्याचे पहावयास मिळते. संबधित विभागातील कर्मचारी व दारु विक्रेते यांचे अर्थिक हित संबध असल्याने हा अवैध दारु विक्रिचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावल्याचे पहावयास मिळत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून होत असलेली अवैध दारु विक्रि त्वरीत बंद करण्यात यावी अशी मागणी सर्वत्र होत आहे.

# लोक कल्याणकारी नेतृत्व : आ. बालाजीराव कल्याणकर

नांदेड उत्तरचे लोकप्रिय आमदार म्हणून ज्यांचे नाव आज नांदेड जिल्ह्याच्या राजकीय पटलावर लोककल्याणकारी नेतृत्व म्हणून आदराने घेतले जाते, असे सर्वांचे लाडके आमदार बालाजीराव कल्याणकर साहेब यांचा १ जून हा वाढदिवस प्रत्येकासाठी आनंदाचा आणि उत्साहाचा क्षण ठरतो.

नेतृत्व म्हणजे केवळ पद नव्हे, तर जनतेच्या मनात निर्माण होणारा विश्वास, आपुलकी आणि जिव्हाळा होय. एखादा नेता आपला माणूस वाटतो, कुटुंबातील सदस्यासारखा वाटतो, तेव्हाच त्या नेतृत्वाला खऱ्या अर्थाने जनतेचे पाठबळ लाभते. ही भावना आज नांदेड उत्तर मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या मनात आमदार कल्याणकर साहेबांबद्दल दिसून येते, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

साहेबांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा साधेपणा आणि सहज उपलब्धता. प्रत्येक व्यक्ती त्यांना हक्काने भेटतो आणि साहेबही प्रसन्न मुद्रेने, हसतमुखाने प्रत्येकाची विचारपूस करतात. सार्वजनिक जीवनातील हे गुण आजच्या काळात दुर्मीळ होत चालले आहेत, पण साहेबांनी ते जपले आहेत.



मतदारसंघातील कोणतीही समस्या असोसामान्य माणसाचा प्रश्न असो किंवा विकासकामाचा मुद्दासाहेब प्रत्येक विषय गांभीर्याने घेतात. शासन दरबारी पाठपुरावा करून, संघर्ष करून आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करून जनतेसाठी काहीतरी मिळवून देण्याची त्यांची तळमळ हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख आहे.

नगरसेवक पदापासून आमदार पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ राजकीय नव्हे, तर जनसेवेचा प्रवास आहे. गेली अनेक वर्षे दिवस-रात्र जनतेसाठी झटणाऱ्या या नेतृत्वाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज नांदेडच नव्हे, तर राज्यस्तरावरही त्यांचे नाव आदराने घेतले जाते.

विकासाच्या बाबतीतही साहेबांनी मोठी कामगिरी केली आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात शासकीय रुग्णालय, कृषी महाविद्यालय, नवीन बसस्थानक, रस्ते, पूल यांसारखी अनेक महत्त्वाची कामे पूर्णत्वास आली आहेत किंवा सुरू आहेत. इतके करूनही आणखी काय करता येईल? हा विचार त्यांना सतत प्रेरित करत असतो.

साहेबांच्या यशामागे त्यांचे कुटुंबही तितकेच योगदान देत आहे. सौ. संध्याताई कल्याणकर यांचे सामाजिक कार्य आणि लोकांशी असलेला संपर्क यामुळे त्यांचेही नाव जनतेच्या मनात घर करून आहे. तसेच सुहास कल्याणकर हेही नगरसेवक म्हणून जनतेच्या सेवेत सक्रिय आहेत.

आमदार बालाजीराव कल्याणकर साहेब यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केला असता काही ठळक गुण दिसून येतात:

दूरदृष्टी मतदारसंघाच्या भविष्याचा स्पष्ट विचार, जनसंपर्क जनतेशी सतत संवाद आणि जवळीक, निर्णयक्षमता योग्य वेळी ठाम निर्णय घेण्याचे धैर्य, सचोटी व प्रामाणिकपणा पारदर्शक आणि विश्वासार्ह कार्यपद्धती, समस्या निवारण कौशल्य सर्वांना सोबत घेऊन मार्ग काढण्याची क्षमता, संयम व सहिष्णुता टीका स्वीकारूनही सकारात्मकतेने पुढे जाणे.

आजच्या स्पर्धात्मक राजकारणात आरोप-प्रत्यारोप, टीका-टिप्पणी या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. पण त्यातून मार्ग काढत, सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची जिद्द साहेबांनी आपल्या कार्यातून दाखवून दिली आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त मतदारसंघातील प्रत्येक नागरिक आनंदाने त्यांना शुभेच्छा देत आहे. जनतेच्या प्रेमावर उभे राहून, कोणताही राजकीय वारसा नसताना स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे हे नेतृत्व खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

साहेबांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या माध्यमातून नांदेड उत्तर मतदारसंघ अधिक प्रगत, समृद्ध आणि आदर्श बनो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. आमदार बालाजीराव कल्याणकर यांना वाढदिवसाच्या कोटी-कोटी शुभेच्छा!

**प्रकाश गिरे पाटील**
**नांदेड**

# ‘८ वाजून १३ मिनिटे’ आजपासून ‘अल्ट्रा झकास’ ओटीटी वर

मुंबई : आयुष्यातील काही क्षण असे असतात, जे सगळंच बदलून टाकतात... आणि जर त्या क्षणासोबत मृत्यूची चाहूल जोडली गेली, तर? अशाच रहस्य, भावना आणि अनपेक्षित घटनांनी भरलेली ‘८ वाजून १३ मिनिटे’ ही बहुचर्चित मराठी वेब सिरीज आज, २९ मे २०२६ पासून ‘अल्ट्रा झकास’ मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाली आहे. प्रदर्शनापूर्वीच आपल्या थरारक ट्रेलरमुळे चर्चेत आलेल्या या वेब सिरीजची प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता ही सिरीज प्रेक्षकांना रहस्य, मानसिक संघर्ष आणि भावनिक गुंतागुंत यांचा वेगळाच अनुभव देण्यासाठी सज्ज झाली आहे.

# सुबोध भावे अभिनीत ‘श्री बाबा नीब करोरी महाराज’ ला उदंड प्रतिसाद

पुणे: २९ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या ‘श्री बाबा नीब करोरी महाराज’ या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अत्यंत उबदार प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटातील आध्यात्मिक खोली, भावस्पर्शी कथाकथन आणि प्रामाणिक अभिनयाचे विशेष कौतुक करत आहेत. आदरणीय नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा वारसा अत्यंत भक्तीभावाने व अस्सलतेने मोठ्या पडद्यावर मांडल्याबद्दल सोशल मीडियावर प्रेक्षक या चित्रपटाची भरभरून प्रशंसा करत आहेत.नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुबोध भावे यांच्यावर विशेष कौतुकाचा वर्षाव होत आहे; त्यांच्या शांत, तल्लीन आणि मनाचा ठाव घेणाऱ्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि चरित्रपटांमधील भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या भावे यांनी या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वात केलेले रूपांतर प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडले आहे.

# सिद्धू-स्नेहाच्या पुनर्मिलनासाठी चाहत्यांची जोरदार मोहीम; सामाजिक माध्यमांवर भावनांचा उद्रेक

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, ‘गंगा माई की बेटियाँ’ या लोकप्रिय मालिकेतील सिद्धू आणि स्नेहा या जोडीच्या विभक्त होण्याच्या कथानकामुळे प्रेक्षकांमध्ये मोठी भावनिक प्रतिक्रिया उमटली आहे. मालिकेने दूरचित्रवाणीवरील लोकप्रियतेचे स्थान कायम राखले असतानाच आता या दोघांच्या नात्याभोवती रंगणाऱ्या घडामोडी चर्चेचा विषय ठरल्या आहेत. अभिनेता शिझान खान, अभिनेत्री अमनदीप सिधू, शुभांगी लाटकर आणि इंदिरा कृष्णा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेतील स्नेहा आणि सिद्धूची जोडी प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. सध्या कथानकात स्नेहाचा शांतनूशी विवाह होण्याची शक्यता दाखविण्यात येत आहे, तर दुसरीकडे सिद्धूही पूर्वीसोबत नवीन आयुष्याची तयारी करताना दिसत आहे. मात्र या घडामोडींमुळे प्रेक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, दोघांना पुन्हा एकत्र आणण्याची मागणी सामाजिक माध्यमांवर वेगाने वाढत आहे.



चाहत्यांनी या जोडीला प्रेमाने ‘स्नेधू’ असे नाव दिले असून विविध संकेतस्थळे, चाहतावर्गाची पाने आणि चर्चागटांवर त्यांच्या पुनर्मिलनासाठी मोहीम सुरू आहे. अनेक प्रेक्षकांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करत या प्रेमकथेचा शेवट विरहात होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. काहींनी निर्माते आणि वाहिनीला थेट संदेश पाठवत कथानकात सकारात्मक वळण देण्याची विनंती केली आहे.

दरम्यान, आगामी भागांमध्ये एखादा मोठा खुलासा किंवा अनपेक्षित घडामोड होऊन सिद्धू आणि स्नेहा पुन्हा समोरासमोर येतील, असा अंदाजही प्रेक्षकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यांच्या नात्यातील प्रामाणिकपणा, त्याग आणि भावनिक जिव्हाळा हेच मालिकेचे सर्वात मोठे आकर्षण असल्याचे चाहत्यांचे मत आहे.

वाढत्या प्रेक्षक प्रतिसादामुळे निर्माते या भावनिक मागणीची दखल घेणार का आणि ‘स्नेधू’ची प्रेमकथा पुन्हा नव्याने फुलणार का, याकडे आता मालिकाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# भाजपाचे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण वर्गाचा समारोप

तभा वृत्तसेवा

खुलताबाद, प्रतिनिधी : वेरूळ येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान’ अंतर्गत जिल्हा प्रशिक्षण वर्गास छत्रपती संभाजीनगर पश्चिम येथे पक्षाची विचारधारा, संघटनात्मक कार्यपद्धती, कार्यकर्त्यांचे व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रहिताच्या ध्येयाने प्रेरित या प्रशिक्षण वर्गात समारोप प्रसंगी कार्यकर्त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या दोन दिवस झालेल्या प्रशिक्षण वर्गातून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करून केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला.भारतीय जनता पक्षाचा इतिहास, मन कि बात, वेळोवेळी पक्षाने दिलेले कार्यक्रम बुथ स्तरावर राबविणे,पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यासह सामाजिक बांधिलकी जपत कार्य करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.



प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल सावे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस आ. डॉ. संजय कुटे, जिल्हा प्रभारी तथा खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड,गंगापूरचे आ प्रशांत बंब, माजी आमदार संजय केनेकर,भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. राजेंद्र फडके, राज्य कार्यकारिणी सदस्य किशोर धनायत,महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा वर्षाताई भोसले, प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन, मनोज पांगारकर, प्रविण घुगे, जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे, वैजापूर नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, जिल्हा परिषद बांधकाम सभापती सचिन गरड पाटील, महिला व बालकल्याण सभापती मीनाक्षीताई पवार, जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस विकास कापसे, , ज्योती गायकवाड, दिनेश परदेशी ,सुभाष आबा काळे,जिल्हा परिषद सदस्या सौ प्रतिक्षा कापसे, कुणाल दांडगे, रतन बत्तीसे, संजय गव्हाणे , खुलताबाद पंचायत समितीचे सभापती सुनीता खंडागळे, गंगापूर पंचायत समितीचे सभापती कविता चव्हाण, पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे, योगिता बर्डे, खुलताबाद तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण, गंगापूर तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण,उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ, शहराध्यक्ष परसराम बारगळ, नगरसेवक मोहन तुपे, उमेश आवारे, योगेश बारगळ, ,कृषणकांत व्यवहारे , गोपाल वर्मा, यांच्यासह गंगापूर , वैजापूर, कन्नड, सोयगाव ,बजाजनगर या छत्रपती संभाजीनगर ( पश्चिम) मधील सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी,मंडळ अध्यक्ष, सरचिटणीस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर आदर्श शिक्षक पुरस्काराने अर्चना गिरवलकर सम्मानित

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३१ : शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा आणि समाजाभिमुख उपक्रमांमधील सक्रिय सहभाग याची दखल घेत शिक्षिका सौ. अर्चना वसंत गिरवलकर यांना यंदाचा प्रतिष्ठेचा "राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदर्श शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्यात आला.



हा मानाचा पुरस्कार छत्रपती संभाजीनगरचे माजी पालकमंत्री, कॅबिनेट मंत्री तथा विद्यमान खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते एका भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. यावेळी पंचायत समिती सभापती वैशाली बोंबले, नगराध्यक्ष विद्या कावसानकर, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच समितीचे अध्यक्ष डॉ. भरत झारगड, पंचायत समिती सदस्य दादासाहेब गलांडे आणि डॉ. सखु झारगड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सौ. अर्चना गिरवलकर यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले समर्पित कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले परिश्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेले योगदान यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षकवर्गातही अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, उपाध्यक्ष ज्योतीताई ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, विद्यासभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, शिवाजी मारवाडी, नंदकिशोर मालाणी, डॉ. राम लोंढे, मनोज शुक्ल, विजय चाटुपळे, किशोर भाकरे, विजय पापडीवाल, रविंद्र साळजोशी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी आणि माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ज्योती जोशी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> "पुरस्कार हा केवळ सन्मान नसतो, तर समाजाप्रती आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या निष्ठेची पावती असते. सौ. अर्चना गिरवलकर यांना मिळालेला हा मानाचा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या समर्पित कार्याची उज्ज्वल दखल आहे."

# किमान १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही १ जून पासून वादळी पावसाचा अंदाज,

मुंबई, दि ३१ मे: सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी:

* शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये
* विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

# प्रतिबंधित गुटखा विक्रीवर कन्नड ग्रामीण पोलिसांचा छापा; किराणा दुकानदाराविरुद्ध गुन्हा

## हिवरखेडा नांदगीरवाडी येथे कारवाई; सुमारे सहा हजारांचा गुटखा व तंबाखू जप्त

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.३१ मे - तालुक्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखू विक्री करणाऱ्यांविरोधात कन्नड ग्रामीण पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू ठेवत हिवरखेडा नांदगीरवाडी येथे छापा टाकून एका किराणा दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखू असा एकूण ५ हजार ९२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २९ मे रोजी दुपारी १.२० वाजेच्या सुमारास हिवरखेडा नांदगीरवाडी येथील जामा मशिदीसमोरील सादिक किराणा अँड जनरल स्टोअर्स येथे छापा टाकण्यात आला. यावेळी दुकानदार राजेखाँ शब्बीरखाँ पठाण (वय ४१, रा. हिवरखेडा नांदगीरवाडी, ता. कन्नड) याच्या ताब्यात विक्रीसाठी साठवून ठेवलेला प्रतिबंधित गुटखा व तंबाखू आढळून आला.

कारवाईदरम्यान विमल पान मसाला किंमत ४,५५४ रुपये, व्ही-१ तंबाखू किंमत ५०६ रुपये तसेच प्रिमियम राजनिवास सुगंधित पान मसाला किंमत ८६४ रुपये असा एकूण ५,९२४ रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल कैलास संपतराव करवंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून गुन्हा पोहेकॉ. एस. डी. शिंदे यांनी दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ. एस. बी. बोराडे करीत असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. प्रतिबंधित गुटखा व तंबाखू विक्रेत्यांविरोधातील अशा कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांची एसओएफ आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड 2025-26 मध्ये उत्कृष्ट कामगिरी

छत्रपती संभाजीनगर, २०२६: सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन (एसओएफ) द्वारे आयोजित २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड परीक्षांमध्ये औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शहराला गौरव मिळवून दिला आहे. यावर्षी ७२ देशांतील लाखो विद्यार्थ्यांनी एसओएफ ऑलिम्पियाडमध्ये भाग घेतला होता, ज्यात छत्रपती संभाजीनगरमधील ६१,००० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या कामगिरींमध्ये, नॉलेज वर्ल्ड शाळेतील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी अनायशा आनंद मुळे हिने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड (आयएमओ) मध्ये प्रथम क्रमांक पटकावला, युनिक पब्लिक स्कूलमधील इयत्ता पहिलीचा विद्यार्थी शिवांश सागर कंदारे याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाड (एनएसओ) मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आणि किड्स वंडर पॅलेस इंग्लिश स्कूलमधील इयत्ता तिसरीचा विद्यार्थी देवांश वाघ याने आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिम्पियाड (आयएचओ) मध्ये प्रथम क्रमांक मिळवला. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि उत्कृष्ट कामगिरीची प्रमाणपत्रे प्रदान केली जातील.

# जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट 2026 यशस्वी; भारताच्या औद्योगिक विकासासाठी नवी दिशा



छत्रपती संभाजीनगर : जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६ या दोन दिवसीय शिखर परिषदेचा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी समारोप झाला. या परिषदेत देशातील नामांकित उद्योगपती, उद्योजक, धोरणकर्ते, गुंतवणूकदार, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले होते.

भारताच्या उत्पादन क्षेत्राला बळकटी देणे तसेच शाश्वत आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेली उद्योग परिसंस्था विकसित करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. उद्योग, नवोन्मेष, गुंतवणूक आणि कौशल्य विकास या विषयांवर सखोल चर्चा घडून आल्या.

परिषदेच्या पहिल्या दिवशी मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स या विषयावर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. जागतिक स्पर्धात्मकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत उत्पादन, पुरवठा साखळी व्यवस्थापन आणि नेतृत्व या विषयांवर उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी आपले अनुभव मांडले.

या दिवशी श्री. जी. श्रीकांत यांनी भारताच्या औद्योगिक विकासाच्या संधी, नेतृत्व आणि भविष्यातील दिशा याविषयी केलेले प्रभावी मार्गदर्शन उपस्थितांना विशेष प्रेरणादायी ठरले. तसेच श्री. स्वप्नील जैन यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव आणि भारतातून जागतिक दर्जाच्या कंपन्या उभारण्याचे स्वप्न याबाबत केलेले प्रेरणादायी भाषण उपस्थितांनी प्रतिसाद देत उभे राहून गौरविले.

# सद्भावना सेवा समितीच्यावतीने आयोजित श्री खाटुशामजी रेल्वे यात्रा व भागवत कथेचे आयोजन - राधेश्याम चांडक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ मे : सद्भावना सेवा समिती द्वारा दि. ३० ऑगस्ट २०२६ ते दि. ०५ सप्टेंबर २०२६ पर्यंत श्री खाटुशामजी रेल्वे यात्रेचे आणि श्रीमद्भावगत कथेचे आयोजन केले आहे. कथा प्रवक्ता चित्रकुट येथील बालसंत श्री दिपशरणजी महाराज आहेत.

शहरातील अनेक शाम भक्तांचा समितीकडे खाटुशाम रेल्वे यात्रा काढावी असा आग्रह केला होता. म्हणुन खास लोकाग्रहास्तव रेल्वे यात्रेचे आयोजन समितीच्यावतीने केले आहे. मर्यादीत संख्या असल्याने जे प्रथम नोंदणी करतील त्यांना घेण्यात येईल व ना नफा ना तोटा या तत्वावर ७ दिवशीय रेल्वे यात्रेचे आयोजन केले आहे. असे आवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले आहे. भागवत कथेचे मुख्य यजमान सरला सुरेशचंद्र गट्टाणी असुन या कथेमध्ये विविध प्रसंग व उत्सव साजरे केले जाणार आहेत. दि. ३१ ऑगस्ट २०२६ ला भागवत कथा महात्म्य, राजा परिक्षीत व शुकदेव कथा, दि.०१ सप्टेंबर २०२६ रोजी शिव विवाह, धृव चरित्र, दि. ०२ सप्टेंबरला राम जन्म, कृष्ण जन्म दि. ०३ सप्टेंबर २०२६ ला रुख्मीनी स्वंयवर, गोवर्धन पुजा, दि. ०४ सप्टेंबर २०२६ ला सुदामा चरित्र, श्री खाटुशामजीच्या पावन भुमीवर भागवत कथेचे आयोजन अत्यंत महत्वाचे मानले जाते. भगवान श्रीकृष्णाचा अवतार खाटुशामला मानतात. अदभुत त्याग व मानवतेच्या





कल्याणासाठी शिशदान अशी अदभुत कथा खाटुशामजीची आहे. कौरव-पांडवाच्या युध्दात जो हारेल त्यांच्याकडुन मी लढेल असे वचन आईला देवून त्याचे तंतोतंत पालन कलीयुगातही खाटुशामजी करीत आहेत. म्हणुन जे जिवनात हताशः होतात, प्रयत्न व परिश्रम करून यश पदरी पडत नाही, नैराश्य येते व हारतात असे भाविक भक्त खाटुशामजीला जातात कारण "हारे का सहारा खाटुखाम हमारा" असे सर्व भक्त खाटुशामजीला जाऊन आपले गाऱ्हाणे मांडतात व ते पुर्ण होते अशी श्रध्दा भाविकांमध्ये आहे.

अल्पशः खर्चात सर्व भाविकांनी चहा, नाश्ता, दोन वेळेचे भोजन, निवास व्यवस्था सद्भावना सेवा समितीद्वारा करण्यात येणार आहे. मलकापूर स्टेशनवरून दि. ३० ऑगस्ट २०२६ दुपारी ११.३० वाजता रेल्वे द्वारा निघायचे आहे. दोन महिने आधी रेल्वेचे आरक्षण करावयाचे असल्याने भाविकांनी ताबडतोब नोंदणी करावे असे आवाहन समितीने अध्यक्ष भाईज़ींनी केले. संपर्कासाठी चंपालाल शर्मा, प्रकाशचंद्र पाठक, राजेश देशलहरा, तिलोकचंद चांडक, सुरेशचंद्र गट्टाणी, सिध्दार्थ शर्मा, उमेश मुंधडा, विजय व्यवहारे, सुभाष दर्डा, मधुकर गायके, पुरणमल शर्मा, मनमोहन शर्मा, लालाभाई माधवाणी यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क करावा.

यात्रा यशस्वी होण्यासाठी ही सर्व मंडळी विशेष परिश्रम घेत आहेत. पुढील वर्षी समितीच्या वतीने बद्रीकेदार येथे अश्या प्रकारच्या रेल्वेच्या आयोजनाचे प्रयत्न केले जाणार आहे व कथा आयोजित केली जाणार आहे. श्री खाटुशामजीच्या आसपास अनेक दर्शनिय स्थळे आहेत जसे शामकुंड, जीनमाता मंदिर, काजळ शिखर रोप वे ने, हर्षनाथ मंदिर, पुष्कर, सावित्रीमाता मंदिर रोप वे द्वारा, लोहगील तिर्थधाम, सालासर बालाजी, जयपुर इत्यादी सद्भावना सेवा समितीद्वारा आयोजित श्री खाटुशामजीच्या पावन भुमीवर श्रीमद्भावगत कथेचा आनंद घ्यावा व पाच दिवस निवास करून अध्यात्तमिक आनंद प्राप्त करावा असे भावपुर्ण आवाहन भाईजींनी केले.

# मंदिर इनाम जमीन हक्क निर्मूलन कायदा 2026 : श्रद्धा, स्वायत्तता आणि सांस्कृतिक वारशाचा प्रश्न

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला ‘मंदिर इनाम जमीन हक्क निर्मूलन कायदा २०२६’ हा मसुदा राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. जमीन व्यवस्थापनाशी संबंधित वाटणारा हा प्रस्ताव प्रत्यक्षात मंदिरांच्या आर्थिक स्वावलंबन, धार्मिक स्वायत्तता आणि सांस्कृतिक अस्तित्वाशी निगडित असल्याने अनेक स्तरांवर चिंता व्यक्त केली जात आहे.

भारतातील मंदिर परंपरा ही केवळ उपासनेपुरती मर्यादित नाही. अनेक देवस्थानांना राजे, संस्थानिक आणि दानशूर व्यक्तींनी शतकानुशतके इनाम स्वरूपात जमिनी प्रदान केल्या. या जमिनींच्या उत्पन्नातून नित्यपूजा, धार्मिक उत्सव, अन्नदान, गोसेवा, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे इनाम जमिनी या मंदिरांच्या आर्थिक व्यवस्थेचा आधारस्तंभ मानल्या जातात.

राज्यातील अनेक ग्रामीण आणि लहान देवस्थानांना मोठ्या देणग्या मिळत नाहीत. अशा ठिकाणी इनाम जमिनींचे उत्पन्नच मंदिर व्यवस्थापनाचा मुख्य स्रोत असते. प्रस्तावित कायद्यामुळे या जमिनींवरील पारंपरिक हक्क कमी झाले किंवा संपुष्टात आले, तर अनेक मंदिरांसमोर आर्थिक संकट निर्माण होऊ शकते. त्याचा परिणाम धार्मिक कार्यक्रमांसह समाजोपयोगी उपक्रमांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.




या विषयाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे धार्मिक स्वायत्तता. भारतीय संविधानातील कलम २५ आणि २६ धार्मिक संस्थांना त्यांच्या व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार प्रदान करतात. त्यामुळे मंदिरांच्या मालमत्तेवरील पारंपरिक हक्कांमध्ये हस्तक्षेप झाल्यास धार्मिक स्वातंत्र्य आणि संस्थात्मक स्वायत्ततेबाबत कायदेशीर प्रश्न उपस्थित होऊ शकतात.

प्रस्तावित कायद्याबाबत काही संघटनांनी समानतेचाही मुद्दा उपस्थित केला आहे. इतर धार्मिक संस्थांच्या मालमत्तांबाबत अशा स्वरूपाचे निर्बंध नसताना केवळ मंदिरांशी संबंधित कायदा आणला जात असल्याची भावना समाजात निर्माण झाल्यास त्याचे व्यापक परिणाम होऊ शकतात, असे मत व्यक्त केले जात आहे.

महाराष्ट्रातील अनेक मंदिरांच्या जमिनींवर वर्षानुवर्षे अतिक्रमणे झाल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे जमीन हक्क कमी करण्याऐवजी अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम राबविणे आणि मंदिरांच्या मालमत्तांचे संरक्षण करणे अधिक आवश्यक असल्याचा युक्तिवादही केला जात आहे.

मंदिरे ही भारतीय संस्कृतीची जिवंत केंद्रे आहेत. अनेक ऐतिहासिक देवस्थाने स्थानिक इतिहास, लोकपरंपरा, स्थापत्यकला आणि सामाजिक जीवनाचे प्रतीक म्हणून उभी आहेत. या मंदिरांचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी आर्थिक स्रोतांची आवश्यकता असते. त्यामुळे इनाम जमिनींच्या प्रश्नाकडे केवळ महसुली किंवा प्रशासकीय दृष्टीकोनातून न पाहता त्याच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक परिणामांचाही गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर मंदिर विश्वस्त, धर्माचार्य, कायदेतज्ज्ञ, सामाजिक संघटना आणि शासन यांच्यात व्यापक संवाद होण्याची गरज व्यक्त होत आहे. कोणताही निर्णय घेताना सर्व संबंधित घटकांची भूमिका समजून घेऊन संतुलित आणि न्याय्य धोरण आखणे ही काळाची गरज आहे.

मंदिर इनाम जमीन हक्क निर्मूलन कायदा हा केवळ जमीन व्यवस्थापनाचा विषय नाही; तो धार्मिक परंपरा, आर्थिक स्वावलंबन, सांस्कृतिक वारसा आणि समाजजीवनाशी जोडलेला संवेदनशील प्रश्न आहे. त्यामुळे याबाबतचा अंतिम निर्णय व्यापक चर्चेनंतर आणि सर्वंकष अभ्यासाच्या आधारेच व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अनिल सांबरे**
**क्षेत्र संपर्क प्रमुख**
**मंदिर व अर्चक-पुरोहित संपर्क विभाग**
**विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र-गोवा**